25 TO 31 DECEMBER 2023 - Page 1 (CRIME SANDHYA):Layout 1 12/23/2023 8:36 PM Page 1


|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

TM Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १२ अंक : १ सोमवार दि. २५ डिसेंबर २०२३ ते रविवार दि. ३१ डिसेंबर २०२३ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड


## कारचा धक्का लागल्याने वाद झाला भाच्यासमोरच मामाचा खून केला



हडपसर/क्राईम रिपोर्टर

आजकाल लोकांना छोट्या छोट्या गोष्टीवरून राग येतो आणि रंगाच्या भरात त्यांच्या हातून काहीही घडू शकते. लोकांना पोलिसांची किंवा कायद्याची जराही भीती राहिलेली नाही. त्यामुळे एखादा गुन्हा करताना त्यांना काहीही वाटत नाही. त्यातच आजकाल दादागिरी लोकांच्या रक्तात भिनू लागली आहे. त्यामुळे दादागिरीच्या ...पान ६ वर

## सासुरवाडीतील लोकांकडून सतत अपमान झाला चिडलेल्या घरजावयाने पत्नीसह चौघांचा खून केला

यवतमाळ/क्राईम रिपोर्टर

समाजातील नात्यामध्ये जावई या शब्दाला खूप मान-सन्मान असतो. त्यामुळे जावईसुद्धा आपले मोठेपण टिकवण्यासाठी सासुरवाडीतील लोकांशी चांगले संबंध ठेवण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे जावयाची सासुरवाडीत चांगली उठबस होते. त्याला चांगला मान-सन्मान मिळतो. जावयाचे हे नाते तसे संवेदनशील असते. ते टिकवण्याची जबाबदारी अर्थातच दोन्हीकडच्या कुटुंबाची असते. आपली मुलगी दिल्या घरी सुखाने नांदत आहे तिला तिच्या पतीकडून अथवा सासरच्या मंडळींकडून कोणताही त्रास नाही हे जेंव्हा मुलीच्या आई-वडिलांना दिसून येते तेंव्हा त्यांच्या नजरेत जावयाची किंमत वाढलेली असते. अशा जावयाचा मानसन्मान करण्यात ते कुठेच कसर करीत नाहीत. पण काही जावई असे असतात की त्यांना दारूचे, जुगाराचे व्यसन असते. त्यामुळे ते पत्नीला मारझोड करतात. परिणामी त्यांची पत्नी संसार सोडून माहेरी जाऊन रहाते. अशा जावयांना सासुरवाडीत कवडीचीही किंमत नसते. आणि जे घरजावई बनलेले असतात त्यांची अवस्था तर आणखी वाईट असते. तिथे त्यांना पत्नी अथवा आपल्या मुलांनाही काही बोलण्याची सोया नसते. घर जावई जरी काम धंदा करीत असला तरी सासुरवाडीतील लोकांकडून त्याला सतत अपमानास्पद वागणूक दिली जाते. ज्यांच्यात सहनशीलता असते ते निमूटपणे हे सर्व सहन करतात. पण ज्यांच्यात स्वाभिमान असतो त्यांना मात्र हे सहन होत नाही आणि मग रागाच्या भरात त्यांच्या हातून काहीही घडू शकते. यवतमाळ जिल्ह्याच्या कळंबमध्ये सासुरवाडीत घरजावई म्हणून राहणाऱ्या गोविंद पवार याच्या बाबतीत असेच झाले. सासुरवाडीत सतत त्याचा अपमान व्हायचा. त्याचा बायकोच्या चारित्र्यावर संशय होता. पण तिला तो काही बोलू शकत नव्हता. कारण सासुरवाडीतले तिचे सर्व नातेवाईक तिच्या बाजूने होते. एकदा तर सासरा व मेव्हण्याने गोविंदाला मारहाण केली होती. त्यामुळे गोविंद चिडलेला होता आणि एकेदिवशी रागाच्या भरात त्याने पत्नीसह सासुरवाडीतील सर्वांवर प्राणघातक हल्ला केला. त्यात सासरा, दोन मेव्हणे व पत्नीचा मृत्यू झाला, तर सासू गंभीर जखमी झाली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी घर जावयाला अटक केली आहे.



राज्यात हत्येच्या घटनांसाठी सतत चर्चेत राहणाऱ्या यवतमाळ जिल्ह्यातील कळंबमधील तिरझडा पारधी बेड्यावर रक्तरंजित घटना घडली. घरघुती वादातून जावयाने सासरा, दोन मेहुणे आणि बायकोलाच संपवलं. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेली सासू मात्र वाचली. मंगळवारी रात्री घडलेल्या घटनेमुळे यवतमाळ जिल्हा हादरून गेला. पत्नीच्या चरित्राच्या संशयावरून ही घटना घडल्याचं स्पष्ट झालं असून पोलिसांनी आरोपी गोविंद विरचंद पवार याला अटक केली आहे. आरोपी गोविंद विरचंद पवार हा काही महिन्यांपूर्वी पत्नी रेखा सोबत सासुरवाडीत राहत होता. त्याला येथे सतत अपमानास्पद वागणूक मिळत असल्याचं बोललं जात आहे. आरोपी गोविंद हा तिच्या पत्नीला मारहाण करत असल्याच्या कारणावरून सासरा पंडित घोसले आणि मेहुण्यांनी त्याला मारहाण केली होती. त्यानंतर मात्र सगळं काही व्यवस्थित झाल्याचं चित्र असताना




आरोपी गोविंद विरचंद पवार

एका महिन्यानंतर गोविंदने त्याचा बदला घेतल्याचं बोललं जातंय गोविंदने मंगळवारी मध्यरात्री संपूर्ण घरावरच सूड उगवला. तिरझडा गावात घरी झोपलेल्या पत्नी आणि मेहुण्याची हत्या केली. नंतर शेतात झोपलेल्या सासरा आणि दुसरा मेहुण्यावर हल्ला केला. यावेळी सासू थोडक्यात बचावली. मात्र तिची प्रकृती गंभीर आहे.जावयाने केलेल्या हल्ल्यात सासरा पंडित घोसले, मेहुणा ...पान ६ वर

## जमिनीच्या वादामुळे रक्ताचे नाते सारले जन्मदात्या बापाला मुलानेच ठार मारले

जळगाव (पहुर)/क्राईम रिपोर्टर



मयत नाना

ग्रामीण भागात शेती हाच मुख्य व्यवसाय असल्याने शेतीच्या वादात माणूस दोस्ती यारी आणि रक्ताची नाती सुद्धा विसरून जातो. जमिनीच्या तुकड्यावरून कित्येक ठिकाणी भाऊ भावाचे वैरी बनून एकमेकांच्या जीवावर उठल्याच्या अनेक घटना घडल्यात, तर काही ठिकाणी पोटच्या पौराणिक जमिनीसाठी आई-वडिलांना संपवले. जळगाव जिल्ह्यातील तरंगवाडी गावात जमिनीवरून झालेल्या वादात जन्मदात्या मुलानेच बापाची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी मुलाला अटक केली आहे.



आरोपी कैलास

शेतीच्या वाटणी हिश्श्यावरुन अनेकदा कित्येक परिवारात वाद होतात. वडीलोपार्जित शेतीच्या वाटे हिश्श्यावरुन भाऊबंदकीत होणारे वाद हे कधी कधी उग्र रुप धारण करतात. हे वाद कित्येकदा एकमेकांच्या जीवावर देखील उठतात. एका पिढीने विकत घेतलेल्या शेतीचे उत्पन्न सुरुवातीच्या काही पिढ्या सुखाने घेतात. मात्र कालांतराने एखाद्या पिढीसाठी हिच शेती वादाचे कारण होते. शेतीत वाटणी हिस्सा मागण्यासाठी भावा भावांमधे, मुलगा आणि बापामधे वाद होतो. हा वाद विकोपाला देखील जातो. वाद विकोपाला गेला म्हणजे एखाद्याची हत्या देखील होते. अशीच एक घटना जळगाव जिल्ह्याच्या पहुर पोलिस स्टेशन हद्दीत घडली. जामनेर तालुक्यातील पहुर पोलिस स्टेशन हद्दीत शेंदुर्णी या गावी वाडी दरवाजा भागात नाना दामू बडगुजर हे ८२ वर्ष वयाचे जेष्ठ नागरिक रहात होते. प्रभाकर नाना बडगुजर आणि कैलास नाना बडगुजर अशी त्यांची दोघी मुले वेगवेगळी रहात





होती. जेष्ठ नागरिक असलेले नाना बडगुजर यांच्यासोबत त्यांचा मुलगा प्रभाकर बडगुजर हा रहात होता. कैलास हा आपला मुलगा विशाल आणि सुन अशांसोबत रहात होता. नाना बडगुजर आणि त्यांचा विभक्त राहणारा मुलगा कैलास या दोघांमधे शेतीच्या वाटणी हिश्श्य्यावरुन नेहमी वाद होत असत. तरंगवाडी शिवारात त्यांचे शेत होते. हा शेतीचा वाद एकेदिवशी आपला जीव घेईल याची पुसटशी देखील कल्पना नाना बडगुजर यांना आली नाही. ९ डिसेंबर २०२३ रोजी नेहमीप्रमाणे नाना बडगुजर त्यांच्या तरंगवाडी शिवारातील शेतात हजर होते. कैलास व त्याचा मुलगा विशाल आणि सुन राजश्री असे तिघेजण मोटार सायकलने शेतात आले. सकाळी नऊ वाजेची वेळ होती. नाना बडगुजर शेतात ...पान ६ वर

## शरीरसुखास तिने दिला नकार दारुड्यांनी महिलेला केले ठार




बिबेवाडी/क्राईम रिपोर्टर

वासनेने पछाडलेले लोक आपली विकृत तहान भागवण्यासाठी सतत शिकार शोधात असतात. अशावेळेस ते जर दारूच्या नशेत असले तर कुठल्याही महिलेवर हात टाकण्याचे धाडस करतात. पुण्याच्या बिबेवाडीत आयुर्वेदिक औषधे विकणाऱ्या एका महिलेकडे दोन नराधमांनी शरीरसुखाची मागणी केली. मात्र तिने नकार देताच त्यांनी तिच्यावर रोडने हल्ला करून तिची हत्या केली. तसेच मृतदेहाची ओळख पटू नये म्हणून तिचा चेहरा विद्रुप केला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.

पुणे : विद्येचं माहेघर आणि सांस्कृतिक राजधानी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुण्यातून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. शरीर संबंध ठेवण्यासाठी नकार दिल्याने महिलेला संपवल्याची थरकाप उडवणारी घटना समोर आलीये. बिबवेवाडी ...पान २ वर

## अपमानामुळे पूर्वीचा मित्र सुडाने पेटला बारमध्ये ठसन होताच बदलाच घेतला

कराड/क्राईम रिपोर्टर

अपमान माणसाला कधीच स्वस्थ बसू देत नाही. अपमानामुळे मनात निर्माण झालेली सुडाची भावना प्रतिस्पर्ध्याचा घात करायला लावते. अशावेळी पूर्वीची मैत्री घरोब्याचे संबंध सर्व काही माणूस विसरून जातो. कराड तालुक्यातील कुसूरमध्ये ऋतुराज व वैभव यांची अशीच मैत्री होती. पण धंद्यातील एका व्यवहारामुळे दोघांची मैत्री तुटली. त्यातच ऋतुराजने वैभवला मारहाण करून त्याचा अपमान केला होता. त्यामुळे वैभवच्या मनात सुडाची भावना होती आणि एकेदिवशी बारमध्ये दोघांची ठसन झाली. त्यामुळे अगोदरच सुडाने पेटलेला वैभव आणखी चिडला आणि त्याने दारूच्या नशेत असलेल्या ऋतुराज याला बार मधून बाहेर नेवून त्याची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीना अटक केली आहे.



कराड तालुक्यातील कुसुर येथे ऋतुराज दिलीप देशमुख हा पत्नी, मुलगी आणि आई वडिलासह राहयला आहे. त्याचा एक भाऊ अक्षय हा पुण्यात नोकरी करीत असल्याने तो पुण्यात राहयला आहे. ऋतुराज हा बिल्डिंग मटेरियला सप्लायचे काम करीत असल्याने त्याची आर्थिक परिस्थीती ही बऱ्यापैकी होती. गेल्या तीन वर्षापूर्वीच त्याचा विवाह झाला होता. त्याला एक वर्षाची मुलगी ...पान २ वर

## दारुमुळे कुटुंबाची शोकांतिका झाली दारुड्याने पत्नी व मुलांची हत्या केली



ठाणे/क्राईम रिपोर्टर

दारूची नशा करी संसाराची दुर्दशा. असे म्हटले जाते आणि ते खरेच आहे. कारण माणसाला दारूचे व्यसन लागले कि त्याचे घरादारावरून लक्ष उडते. कामधंद्यावरून मन उडते. सर्व पैसे दारूमध्ये खर्च होत असल्याने घरात भांडणे सुरु होतात. दारुडा माणूस कुटुंबासाठी अक्षरशः डोकेदुखी ठरतो. कासारवडवलीत राहणार अमित बागडी याच्याही बाबतीत असेच घडले होते. त्याच्या दारूच्या व्यसनामुळे घरात नेहमी भांडणे व्हायची. याच भांडणाला कंटाळून अमितची पत्नी आपल्या दोन मुलांसह अमितच्या भावाकडे म्हणजेच दिराकडे रहायला गेली होती. तर अमित तिथेही हजर झाला आणि त्याने पत्नी व २ मुलांना बॅटने प्रहार करून ठार मारले.

ठाण्यातील कासारवडवली भागात तिहेरी हत्याकांडाची घटना घडली आहे. पतीने पत्नी आणि दोन मुलांची हत्या ...पान २ वर

## पोलिसांनी उधळला प्रेमी युगलाचा डाव प्रेमासाठी केला त्यांनी दरोड्याचा बनाव








धुळे/क्राईम रिपोर्टर

आजकालची मुले इतकी हुशार असतात कि त्यांना जे हवे असते ते मिळवण्यासाठी त्यांची कोणत्याही थराला जाण्याची तयारी असते. खास करून एखादी मुलगी प्रेमात पडली, तर प्रियकराला तिची काहीही करण्याची तयारी असते. एका तरुणीने प्रियकराच्या सोबत पळून जाण्यासाठी आपल्याच घरात दरोडा टाकून दरोडेखोरांनी आपले अपहरण केल्याचे नाटक रचले. पण पोलिसांनी तिचा डाव हाणून पडला आणि तिला प्रियकरासह अटक केली.

धुळे शहरातील चितोड रोडवरील क्रांती चौकात रहाणारे विनायक माधवराव भोसले हे आपल्या पत्नीसह घराला कुलूप लावून पाहुण्यांना पोहोचवण्यासाठी मुख्य बसस्थानकावर गेले होते. पाहुण्यांना बसमध्ये बसवून ते घरी आले, तेंव्हा त्यांना त्यांच्या घराच्या दरवाजाचा कडीकोयंडा तुटलेला दिसला. आपल्या घराचा कोणीतरी कडी-कोयंडा तोडून टाकल्याचे पाहून विनायक भोसले घाई-गडबडीने घरात शिरले असता त्यांना लाकडी कपाटाची मोडतोड झालेली दिसली. त्या कपाटात त्यांनी ५ लाख २४ हजार ठेवले होते. ते सुरक्षित आहेत का? हे त्यांनी पाहिले तेंव्हा ते रूपये गायब झाल्याचे त्यांना दिसून आले, तेंव्हा ते मटकन खालीच बसले. त्यांची पत्नी तर ...पान २ वर

## शुल्लक गोष्टीवरून दारूच्या पार्टीत वाद झाला डोक्यात सोड्याची बाटली फोडून मित्राचा खून केला

कोल्हापूर/क्राईम रिपोर्टर

दारूची पार्टी म्हटली कि त्यात वादविवाद आले. पण पार्टीतल्या लोकांना दारूची नशा चढली कि मग कोणत्याही शुल्लक गोष्टीवरून वाद सुरु होतात आणि दारूच्या नशेत असलेल्यांचा स्वतःवर ताबा नसल्याने त्यांच्या हातून काहीही घडू शकते. कोल्हापुरात चार मित्र दारू प्यायला बसले होते. त्यांच्यातील दोघांमध्ये सोडा आणण्यावरून वाद झाला. या वादात समीरने विनायक याला बेदम मारहाण केली आणि सोड्याच्या बाटलीने त्याचे डोके फोडले. यात गंभीर जखमी झालेल्या विनायक याचा मृत्यू झाला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी समीरला अटक केली आहे.



कोल्हापूर शहरातील सदर बाजार येथे विनायक विश्वास लोंढे हा राहयला आहे. त्याचे आई-वडिल त्याच्या लहानपणीच वारल्याने तो सध्या तो एकटाच राहत आहे. शहरात मिळेल ते काम करून मोलमजुरी करून आपला उदरनिर्वाह करीत होता. तो एकटाच राहत असल्याने आणि मोलमजुरीचे काम करीत असल्याने त्याला दारु पिण्याची सवय लागली. तो मिळेल ते पैसे दारू पिण्यात खर्च करीत होता. हॉटेल में खाना मस्जिद मे सोना अशी त्याची गत झाली होती. त्याला आगे पिछे कुणीच नसल्याने समजावून सांगणारे ही कुणीच नव्हते. मोलमजुरी करणारेच त्याचे मित्र होते. रेल्वेस्टेशन, शाहुपुरी मार्केट यार्ड परिसरात तो हमालीचे काम करीत होता. सदर बाजार परिसरातील आपल्या घराकडे तो कधी तरीच जात होता. मध्यवर्ती बस स्थानक परिसरात तो रात्रीच्या वेळेला बंद दुकानाशेजारी झोपत होता.हॉटेलात भजी पाव खाणे, रात्रीच्या वेळी दारू पिऊन तेथेच ...पान ६ वर

पान १ वरून...

## शरीरसुखास तिने दिला नकार...

परिसरातील एका मंदिराजवळ महिलेचा मृतदेह आढळला होता. पोलिसांनी या प्रकरणाच्या खोलात जात तपास केल्यावर जे सत्य समोर आलंय त्याने पुणे हादरून गेलं आहे. बिबवेवाडीमधील गोयला गार्डन समोर मृत महिलेचा पाल होता, ती काही आयुर्वेदिक औषधे विकत असल्याची माहिती आहे. ९ डिसेंबरला ती महिला नेहमीप्रमाणे आपल्या पालावर झोपायला आलेली. त्यावेळी आरोपी दारूच्या नशेत पालावर येत तिच्याकडे शरीर सुखाची मागणी करू लागले. महिलेने नकार दिल्याने आरोपीने तिथे असलेल्या रॉडने महिलेला मारत जाग्यावरच संपवलं. आरोपींनी गुन्हा लपवण्यासाठी वाईट कृत्य केलं. महिलेची ओळख न पटण्यासाठी त्यांनी तिच्या चेहऱ्यावर गंभीर घाव घातले. पोलिसांनी या प्रकरणाचा शोध घेण्यासाठी एका टुव्हिलर तपास करताना बिबवेवाडीपासून ते चाकणपर्यंत पोलिसांनी या तब्बल २५० सीसीटीव्ही कॅमेरे चेक केले. यानंतर पोलिसांनी दोन संशयितांना अटक केली. रविसिंग चितोडिया आणि विजय मारूती पाटील अशी आरोपींची नाव आहेत. संशयित टुव्हिलरमुळे रविसिंग चितोडिया याचं नाव समोर आलं, त्याला नाशिक येथून पोलिसांनी ताब्यात घेतलं. चौकशीदरम्याने त्याने विजय पाटील यांच नाव घेतलं. पोलिसांनी त्याला पालघर येथून पकडलं. दोघांची कसून चौकशी केल्यावर दोघांनी गुन्हा कबूल केला. दरम्यान, या घटनेची पुण्यात सर्वत्र चर्चा होत असलेली पाहायला मिळत आहे. शरीर सुखासाठी नराधमांनी महिलेला संपवलं. पुण्यात गुन्हेगारांना पोलिसांचा वचक राहिला आहे की नाही असा प्रश्न निर्माण होत आहे. महिलांच्या सुरक्षेचा मुद्दाही पुन्हा एकदा समोर आला आहे.

## अपमानामुळे पूर्वीचा मित्र सुडाने...

ही आहे. तो बिल्डिंग मटेरियल सप्लायचे काम करीत असल्याने त्याची अनेकजणाबरोबर उठबस ही होत होती. यातूनच त्याची ओळख ही कुसुर जवळील मालदन येथील वैभव काळे याच्याबरोबर झाली.तो ही त्याच्याच धंदयातील असल्याने त्या दोघांचे जमत होते. ते दोघे जेवायला प्यायला एकत्र बसत होते. त्याची पार्टया या नेहमी चालयाच्या. त्या दोघातील मैत्री ही घट्ट बनली होती. परंतु मागील सहा सात महिन्यापूर्वी एका व्यवहरातून त्याचे व वैभवचे फिस्कटले होते. त्यात वैभव काळे याला नुकसान सोसावे लागले होते. त्यामुळे त्याने चिडून त्यावेळी ऋतुराजबरोबर भांडण काढले होते. त्या भांडणात ऋतुराज याने वैभव काळे याला मारहाण केली होती. त्यामुळे वैभव हा त्याचेवर चिडून होता. खरे तर त्या व्यवहारात ऋतुराज याने वैभव याचा अपमान देखील केला होता.त्यावेळेपासून वैभव हा त्याचेबरोबर जेवायला दारू प्यायला जात नव्हता. त्याला मागील भांडणाचा राग आलेला होता. एक तर ऋतुराज याने त्याचे नुकसान केले आणि वरून त्याचा अपमान ही केला असल्याने ते तो विसरू शकत नव्हता. या जगात सगळे काही विसरण्यासारखे असले तरी काही वेळा झालेला अपमान हा विसरता येत नसतो तसेच वैभव याचे झाले होते. दोघे ही तरूण असल्याने दोघांच्या ही अंगात रक्त सळसळत होते. दोघे ही कधी समोरा समोर भेटले तरी त्या दोघांतून विस्तव ही जात नव्हता. दोघे ही एकमेकांना बघून घेण्याची भाषा करीत होते. वैभव हा त्याचा बदला घेऊ इच्छित होता. त्याने तसे आपले जवळचे मित्र उमर मुल्ला व शुभम खेडकर यांना देखील बोलून दाखविले होते. ढेबेवाडी येथील उमर मुल्ला व शुभम खेडकर हे वैभव याचे चांगले जवळचे मित्र होते. त्या दोघांना ही वैभव आणि ऋतुराज याचेतील वाद माहित होता. त्यांनी ही ऋतुराज देशमुख याच्या विरोधात वैभवला चिथवण्याचेच काम केले होते. तु ऋतुराजचा बदला घे. त्या कामात आम्ही तुला मदत करतो असे त्यांनी त्याला आश्वासन दिले होते. त्यामुळे वैभव हा ऋतुराज याला मारण्यासाठी संधी शोधत होता. त्याला ऋतुराज हा वांग नदीच्या शेजारी असलेल्या उमा महेश बिअर बारमध्ये दारू पिण्यासाठी नेहमी येत असतो हे माहित होते. सोमवार दि.१८ डिसेंबर २०२३ रोजी उमा महेश बारमध्ये नेहमीप्रमाणे ऋतुराज हा आपल्या दोघा मित्राच्या बरोबर दारू पिण्यासाठी आला. त्यावेळी तेथे अगोदरच त्याच्या मागील बाजूस असणाऱ्या समोरच्या टेबलावर वैभव काळे, उमर मुल्ला व शुभम खेडकर हे तिघेजण दारू पित बसले होते. ऋतुराजला ते तिघे ही समोरच्या टेबलावर बसलेले असल्याचे दिसत होते. अर्धा तासानंतर जस जशी दारूची नशा ऋतुराज याला होऊ लागली तसे तसे तो वैभव काळे आणि त्याच्या मित्रांच्याकडे डोळे रोखून बघत होता. त्याच्या डोळ्यात खुन्नस होती. मागील भांडणाचा राग उकरून काढण्याची संधी हिज आहे हे वैभव काळे आणि त्याच्या मित्रांनी ओळखले. त्यांना ही दारूची नशा चढली होती. बारमध्ये पिणाऱ्या लोकांची गर्दी असल्याने जरा गोंधळच वाढला होता. त्यातच बारमध्ये गाणी ही लावली असल्याने कोणाचे कोणाला काही ऐकू जात नव्हते. एका बाजूने वैभव त्याच्याकडे बघत होता तर दुसरीकडून ऋतुराज हा ही त्याचेकडे बघत होता. त्यातच ऋतुराज याच्या टेबलाजवळ वैभव काळे उमर मुल्ला आणि शुभम खेडकर हे आले. ऋतुराज याला ते तिघे ही बील भागवून जात असल्याचे वाटले.तेवढयात वैभवने ऋतुराजला याला माझे तुझ्याकडे जरा काम आहे, आपण बाहेर जाऊन बोलू असे सांगितले.ऋतुराज याने ही त्यावेळी आपल्या दोघा मित्रांना मी जरा याच्याबरोबर बाहेर जावून येतो तुम्ही चालू ठेवा असे सांगून तो त्याचेबरोबर बाहेर गेला. बारच्या बाहेर आल्यावर ते तिघे ही ऋतुराजबरोबर वाद घालू लागले. तो ही त्याचेवर चिडून बोलत होता. त्या तिघांनी त्याला दमदाटी देत वांग नदीच्या शेजारी असणाऱ्या कच्चा रस्त्याला नेले. बारपासून सुमारे १०० फुट लांब नेत त्यांनी त्याला मारहाण करायला सुरूवात केली. ऋतुराज त्याना प्रतिकार करू लागला होता. परंतु त्या तिघांच्यासमोर तो एकटाच होता. ते तिघे ही त्याला लाथाबुक्कांनी मारहाण करू लागले होते. तो खाली पडून ओरडत होता. परंतु नदी शेजारीला रस्त्यावर त्यावेळी कुणी नव्हते. त्यामुळे त्याच्या ओरडण्याचा आवाज कोणाला ऐकू जात नव्हता.त्यातच वैभवने जवळच पडलेला एक मोठा दगड घेतला आणि खाली पडलेल्या ऋतुराजच्या डोक्यात जोरात हाणला. त्याबरोबर त्याच्या डोक्यातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव सुरू झाला. तो मला वाचवा वाचवा असे म्हणत होता. त्याची तडफड चालू होती. आपण केलेल्या मारहाणीत ऋतुराज हा गंभीर जखमी झालेला आहे हे त्यांनी ओळखले. त्याला तशा अवस्थेत त्यांनी ओढत रस्त्याच्या बाजुला असणाऱ्या झाडाझुडपा लगत असणाऱ्या एका खड्डयात ओढून नेऊन टाकले आणि तेथून ते पसार झाले. इकडे बराच वेळ बारच्या बाहेर गेलेला आपला मित्र ऋतुराज हा परत आला नाही म्हणून त्याचे मित्र बारच्या बाहेर येवून त्याला मोबाईल कॉल करू लागले. त्याच्या मोबाईलची रिंग वाजत होती. जवळपासच तो कुठे तरी असावा म्हणून मोबाईल रिंगच्या आवाजाने त्याचे मित्र त्याला शोधत कच्चा रस्त्यापर्यत गेले.वांग नदी शेजारी असणाऱ्या कच्चा रस्त्यावरील एका खड्डयातून त्यांना कोणाचा तरी विव्हळण्याचा आवाज येवू लागला.त्यांनी जवळ जावून मोबाईलच्या बॅटरी लावून पाहिले असता त्या खड्डयात ऋतुराज हा विव्हिळत पडला होता. त्याच्या डोक्याला मोठी जखम झाली होती. बाजुलाच रक्ताने माखलेला दगड ही पडलेला होता. त्याच्या मित्रांनी १०८ नंबर डायल करून लगेच त्या ठिकाणी ॲम्बुलन्स बोलावून घेतली. या घटनेची माहिती ऋतुराज याचा भाऊ अक्षय याला दिली. तो ही सकाळीच पुण्याहून कुसूर येथे आला होता.त्याला ही माहिती समजात तो ही घटनास्थळी आला. त्यांनी ऋतुराजला ॲम्बुलन्स मध्ये घालून कराड येथील कृष्णा हॉस्पिटल येथे उपचारासाठी आणले.तेथील डॉक्टरांनी त्याला तपासून त्याचा उपचारापूर्वीच वाटेत मृत्यू झाल्याचे सांगितले. कुणी तरी या घटनेची माहिती ढेबेवाडी पोलीसांना दिल्यावर पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी घटनास्थळावर रक्ताने माखलेला दगड व रक्त मिश्रीत माती दिसून आली. पोलीसांनी घटनास्थळी श्वान पथकाला बोलावून घेतले. श्वान ही काही अंतरावर जावून घुटमळले. त्यामुळे संशयीत आरोपीचा मागमुस काही लागला नाही. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून या घटनेची माहिती मयत ऋतुराज याचा भाऊ अक्षय याच्याकडून घेतली. त्याने ऋतुराज हा उमा महेश बिअर बारमध्ये दारू पिण्यासाठी गेले असता तेथे त्याची वादावादी वैभव काळे, उमर मुल्ला आणि शुभम खेडकर याच्याबरोबर झाल्याची माहिती दिली. घटनास्थळावरून हे तिघे ही संशयीत पळून गेले होते. तिघांचे ही मोबाईल स्विच ऑफ लागत होते. बिअर बारच्या सीसीटीव्ही फुटेजमध्ये वैभव काळे हा ऋतुराज याला बोलावून बाहेर नेत असल्याचे दिसत होते. त्याच्या बरोबर त्याचे आणखीन दोघेजण ही दिसत होते. संशयीत आरोपीचा माग काढण्यासाठी ढेबेवाडी पोलीसाची दोन पथके तैनात करण्यात आली होती. त्यातील एका पथकाला वैभव काळे आणि त्याचे मित्र हे पुण्याहून परत येत असल्याची माहिती मिळाली या माहितीच्या अधारे पोलीसांनी पुण्याहून परत येत असताना वैभव काळे, उमर मुल्ला आणि शुभम खेडकर यांना ताब्यात घेतले. त्यांना ढेबेवाडी पोलीस स्टेशनला आणून त्याचेकडे या घटनेची चौकशी करीत असताना ते तिघे ही ना चा पाढा वाजत होते.पोलीसांनी त्यांना पोलीसी खाक्या दाखविताच त्यांनी आपला गुन्हा कबुल करून तो का? आणि कशासाठी केला याची माहिती दिली.त्यांनी आपला गुन्हा कबुल केल्यावर अक्षय देशमुख याने दिलेल्या फिर्यादीवरून ढेबेवाडी पोलीस स्टेशमध्ये ऋतुराज दिलीप देशमुख (वय ३२) याच्या खून प्रकरणी वैभव काळे (वय २८) उमर मुल्ला (वय २५) आणि शुभम खेडकर (वय २३) याच्या विरोधात भा.दं.वी. कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्यांना कराड येथील प्रथमवर्ग न्यायालयासमोर हजर केले असता मा.न्यायालयाने त्यांना पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनवाली. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेला दगड जप्त केला. या घटनेचा पुढील तपास पो.निरी. अभिजीत चौधरी याच्या मार्गदर्शनाखाली ढेबेवाडी पोलीस करीत आहेत. मागील भांडणची खुन्नस मनात असली की जवळचा मित्र ही वैरी बनतो आणि त्यातच दारू पिण्याचे व्यसन असले की नेमकी हिच संधी समोरच्याला मिळते आणि समोरच्याचा काटा काढला जातो हेच या घटनेवरून दिसून येते.

## पोलिसांनी उधळला प्रेमी युगलाचा ...

रडकुंडीला आली होती. थोडा वेळ त्या दोघांना काही सुचलेच नाही. नंतर मात्र त्यांनी स्वतःला सावरले आणि त्यांनी धुळे शहर पोलीस स्टेशन गाठले. पोलीस स्टेशनमध्ये त्यांनी चोरीची फिर्याद दिली. त्याआधारे भा.दं. वि. ३८०, ४५४ प्रमाणे गुन्हा नोंदवला गेला. पोलीस निरीक्षक आनंदराव कोकाटे यांच्या नेतृत्वाखाली उपनिरीक्षक दत्तात्रय ऊजे, हेडकॉन्स्टेबल विजय शिरसाठ, पोलीस नाईक कुंदन पटाईत, रविंद्र गिरासे, कॉन्स्टेबल महेश मोरे, मनिष सोनगिरे, प्रविण पाटील. वसंत कोकणे, अमित रनमळे या शोध पथकाने विलास रोकडे आणि अतुल पाटील यांचे सहकार्य घेत जय श्वान पथकाला कार्यरत केले. श्वानाने घटनास्थळावरील काही वस्तूंचा वास घेतला आणि घराबाहेर धूम ठोकली. ते श्वान पथक हुडको वसाहतीतील एका घरासमोर येवून थांबले. ज्या घरासमोर हे श्वान थांबले त्या घरात रहाणाऱ्या लोकांची चौकशी करता ते घर विनायक भोसले यांच्या भावाचे अरविंद माधवराव भोसले यांचे होते.

साहजिकच पोलीस शोध पथकाचा अरविंद भोसले आणि त्यांच्या कुटुंबातील संबंधित व्यक्तीवर संशय निर्माण झाला. अरविंद माधवराव भोसले, त्यांच्या घरातील सदस्य, तसेच त्यांच्या शेजाऱ्या – पाजाऱ्यांचे, विनायक भोसले यांच्या घराशेजारी रहाणाऱ्या लोकांचे प्राथमिक जबाब नोंदवून घेण्याचा आदेश पोलीस निरीक्षक आनंदराव कोकाटे यांनी शोध पथकाला दिला. या जबाबाची पडताळणी पोलीस निरीक्षक कोकाटे यांनी केली असता त्यांच्या संशयाची सुई अरविंद भोसले यांचा मुलगा कुणाल याच्यावर स्थिरावली. याबाबतची माहिती पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांना कळवण्यात आली असता त्यांनी कुणालला ताब्यात घेण्याचे आदेश दिले. अर्थात कुणाल हा घरी नव्हताच. त्याचा शोध घेतला असता तो मालेगाव रोडवरील गुरूद्वारा परिसरात मिळून आला. कुणालच्या ताब्यातील ॲक्टीव्हा स्कुटर शोध पथकाने ताब्यात घेतली आणि त्याला धुळे शहर पोलीस स्टेशनमध्ये आणले. पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अप्पर पोलीस अधीक्षक किशोर काळे, उपविभागीय पोलीस अधिकारी सचिन हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक आनंदराव कोकाटे यांच्या नेतृत्वाखाली शोध पथकाने चौकशी दरम्यान कुणाल भोसले याला बोलते केले, तेंव्हा त्याने त्याच्या काकाचे घर फोडून त्याच्या घरातील पाच लाख २४ हजार रूपये चोरल्याचे कबुल केले. कुणालने कबुली देताच त्याच्याजवळील स्कुटीची झडती घेतली असता डिकीत चोरीचे पाच लाख चोवीस हजार रूपये मिळून आले. विनायक भोसले यांच्या घरात झालेल्या चोरीचा छडा लावण्यात पोलिसांना यश आले होते. वरीष्ठ अधिकाऱ्यांनी या शोध पथकाचे अभिनंदन केले. भरदिवसा घडलेल्या या चोरीचा तपास चालू असतांनाच भोसले यांच्या घरात चोरी झाली होती, त्याच दिवशी म्हणजे दि. २५ नोव्हेंबर २०२३ रोजी रात्री साक्री येथील दौलत बंगल्यावर धाडसी दरोडा पडला.. त्या दरोड्यात घरातील ८० हजाराचे दागिने आणि २३ वर्षाची युवती दरोडेखोरांनी पळवून नेल्याची खळबळजनक घटना घडल्याने धुळे जिल्हा पोलीस दल हादरले होते. धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यातील साक्री शहरातील दहिवेल रस्त्यावरील, विमलबाई कॉलेज परिसरातील सरस्वतीनगरमधील 'दौलत' बंगल्यावर दि. २५ नोव्हेंबर २०२३ रोजी रात्री साडेदहा वाजण्याच्या दरम्यान पाच दरोडेखोरांनी दरोडा टाकला. ८० हजार रूपये किंमतीचे दागिने आणि घरातील २३ वर्षाच्या तरण्याबांड मुलीला उचलून नेल्याची खबर पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांच्यापर्यत येवून धडकताच त्यांच्यासह इतर वरीष्ठ अधिकाऱ्यांना धक्काच बसला. दौलत बंगल्यात वास्तव्याला असलेले निलेश पाटील हे कारणपरत्वे संगमनेरला गेले होते. त्यादिवशी त्यांची पत्नी ज्योत्स्ना या घरी एकट्याच होत्या. त्यांच्या सोबतीला त्यांची भाची म्हणजे सुप्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते मोठाभाऊ शेवाळे यांची कन्या निशा ही आपल्या आत्याकडे तिची सोबत म्हणून आली होती. दि. २५ नोव्हेंबर रोजी रात्री साडेनऊ वाजता त्या दोघींनी म्हणजे आत्या आणि भाचीने गप्पा मारत जेवण केले. नंतर त्या दोघी गप्पा मारत बसल्या असता दारावर थाप मारण्याचा आवाज ज्योत्स्ना पाटील यांना ऐकू आला. आपले पती घरी आले असावेत असे समजून त्यांनी घराचा दरवाजा उघडला, तर एक काळे कपडे परिधान केलेला, चेहऱ्यावर काळा मास्क बांधलेला अनोळखी इसम हातात चाकू घेवून घरात शिरला. त्या इसमाने ज्योत्स्ना पाटील यांना हिंदीत दम देत तोंड बंद ठेवण्यासाठी दरडावले. त्या दरम्यान आणखी चार जण घरात शिरले. त्यांनी ज्योत्स्ना पाटील आणि निशा शेवाळे या दोघींना स्वयंपाकघरात ढकलत नेले. तेथे ज्योत्स्ना यांना मारठोक करत 'सोना कहाँ है? निकालो' असे म्हणत दरडावले. दोन-चार दणके बसल्याने ज्योत्स्ना घाबरल्या. त्यांना दरदरून घाम फुटला. त्यांना धड बोलताही येत नव्हते. थरथरत्या हातांनी मांडणीवरच्या एका डब्यातून त्यांनी घरातील कपाटाच्या चाव्या त्या दरोडेखोरांच्या ताब्यात दिल्या. त्या चाव्या हातात पडताच त्यांनी ज्योत्स्ना यांच्या तोंडात कापडाचा बोळा कोंबला. हात-पाय दोरीने बांधले. इतर दोन दरोडेखोरांनी कपाट उघडून कपाटातील दागिने काढून घेतले. ज्योत्स्ना यांच्या शेजारी काही अंतरावर त्यांची भाची निशा उभी होती. तिच्याकडे पहात एका दरोडेखोराने 'इस लडकी को भी साथ ले चलो' असे म्हणत तिचे हात बांधून तिलाही आपल्यासोबत घेतले. दौलत बंगल्याच्या बाहेर दरोडेखोरांची एम.एच.१८ बी.एफ. १३०१ क्रमांकाची गाडी उभी होती. त्या गाडीत निशाला बसवले आणि ते दरोडेखोर निघून गेले. दागिन्यासोबत दरोडेखोरांनी आपल्या तरण्याबांड भाचीला पळवून नेल्याने दरोडेखोर नजरेआड होताच ज्योत्स्ना पाटील मोठमोठ्याने ओरडू लागल्या. त्यांच्या आवाजाने शेजार पाजारचे लोक धावत आले. त्यांना ज्योत्स्ना यांनी घडलेली हकीकत सांगितली, तेंव्हा त्या लोकांनी । याची खबर साक्री तालुका पोलीस स्टेशनला कळवली. दरोडेखोरांनी दागिन्यांसह २३ वर्षाच्या तरूणीला पळवून नेल्याची माहिती कळताच साक्री पोलीस स्टेशनचे कर्मचारी घटनास्थळी तात्काळ आले. या घटनेची माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी साजन सोनवणे यांना कळताच तेही फौजफाट्यासह दौलत बंगल्यावर आले. या गंभीर घटनेचा तपास करण्याची जबाबदारी पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी साक्री पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मोतीराम निकम हे रजेवर असल्याने पिंपळनेर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्रीकृष्ण पारधी यांच्यावर सोपवली. साक्री पोलीस स्टेशन आणि स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलिसांची चार तपास पथके तयार करून त्यांच्यावर तपासाची जबाबदारी सोपवली. यावेळी जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशनला तसेच शेजारील गुजरात आणि मध्यप्रदेशमधील पोलिसांनाही अलर्ट करण्यात आले..

दरम्यान दुसऱ्या दिवशी सकाळी म्हणजे दि. २६ नोव्हेंबर २०२३ रोजी निशा शेवाळे हिच्या वडीलांना म्हणजे मोठाभाऊ शेवाळे यांना फोन आला. 'मी सेंधवा गावात आहे. माझ्याजवळ पैसे नाहीत. मला घ्यायला या.' असा निशाचा फोन आला. स्वतः निशानेच फोन केल्याने तिच्या वडीलांनी साक्री पोलिसांना ही बाब सांगितली. निशा शेवाळे ही सेंधवा गावात असल्याचे कळताच साक्री पोलिसांनी व तपास अधिकारी पोलीस निरीक्षक पारधी यांनी सेंधवा येथील पोलिसांशी संपर्क साधला. त्या पोलिसांना निशा हिला ताब्यात घेवून तिला संरक्षणात ठेवण्याची विनंती केली. ही माहिती पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांना कळताच त्यांनी सांगवी पोलिसांना सेंधवा पोलिसांच्या ताब्यातून निशा शेवाळे हिला आपल्या ताब्यात घेण्याचे आदेश दिले, त्याप्रमाणे सांगवी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संदीप पाटील हे आपल्या सहकाऱ्यांसह सेंधवा (मध्यप्रदेश) पोलीस स्टेशनला गेले. त्यांनी कायदेशीररित्या निशा मोठाभाऊ शेवाळे या तरूणीला आपल्या ताब्यात घेतले आणि तशी माहिती साक्री पोलिसांना दिली. त्यानंतर साक्री पोलीस पथक हे निशाचे वडील मोठाभाऊ शेवाळे यांना घेवून सांगवी पोलीस स्टेशनला गेले. निशा शेवाळे हिला आपल्या ताब्यात घेवून ते साक्री पोलीस स्टेशनला आले. दरम्यान रजेवर गेलेले साक्री पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मोतीराम निकम हे रूजू होताच त्यांनी हा तपास आपल्या हाती घेतला. या प्रकरणामागे नक्कीच काहीतरी गुढ दडले आहे याचा संशय पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांच्यासह सर्वच पोलीस अधिकाऱ्यांना होता. दरम्यान निशा शेवाळे हिला तिच्या आई-वडीलांच्या ताब्यात दिले, पण घटनेने भयभीत झालेली ही तरूणी आजारी पडली. तिला उपचारासाठी साक्रीतील अहिरराव रुग्णालयात दाखल करावे लागले. तिच्या प्रकृतीची चौकशी करण्यासाठी साक्री पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मोतीराम निकम, पिंपळनेर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्रीकृष्ण पारधी हे सहकाऱ्यांसह अहिरराव रुग्णालयात गेले. तेथे निशाच्या तब्येतीची चौकशी करून दोन्ही पोलीस निरीक्षक परतत असतांना कर्मधर्मसंयोगाने पोलीस निरीक्षक मोतीराम निकम यांना या प्रकरणाची उकल करणारा एक दुवा मिळाला आणि या प्रकरणात गूढ दडलं असल्याच्या पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांच्या शंकेवर शिक्कामोर्तब झाला. पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी या प्रकरणाचं गूढ उकलण्याच्या कामाला चालना दिल्यानंतर स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीस निरीक्षक दत्तात्रय शिंदे यांच्या नेतृत्वाखालील तपास पथकाने मोगलाईतील गवळी वाड्यात राहणाऱ्या वाहन चालक रोहित संजय गवळी याला चौकशीसाठी ताब्यात घेतले. त्याचवेळी या प्रकरणातील मुख्य संशयित आरोपी विनोद भरत नाशिककर याला इंदोरमधील खलघर परिसरातील टोलनाक्याजवळून ताब्यात घेण्यात आले. त्या दोघांनाही साक्री पोलीस स्टेशनमध्ये आणले. त्या दोघांचीही वेगवेगळी चौकशी करण्यात आली असता धक्कादायक माहिती बाहेर आली. निशा मोठाभाऊ शेवाळे ही तरूणी आपल्या कुटुंबीयासमवेत साक्री शहरातील आदर्शनगरात ज्या घरात रहाते त्या घराशेजारी मध्यप्रदेशातील शाजापूर शहरातील गायत्रीनगरात रहाणारा आणि सौरऊर्जा कंपनीत काम करणारा विनोद भरत नाशिककर हा विवाहित इसम आपल्या बायकोसह आणि दोन वर्षाच्या मुलासह रहात होता, तेंव्हापासून निशाचे विनोदशी प्रेमसंबंध जुळून आले होते. विनोद हा साक्री येथील भाड्याचे घर सोडून मध्यप्रदेशातील शाजानगरात आपल्या घरी रहायला गेला तरी निशाही तरूणी विनोदशी संबंध ठेवूनच होती. निशाचा विनोदबरोबर पळून जाण्याचा प्लॅन आधीपासून शिजत होता. तो प्लॅन दि. २५ नोव्हेंबर २०२३ रोजी अंमलात आणण्याचा निर्णय निशा आणि विनोद यांनी घेतला होता. निशाच्या सल्ल्यानुसार विनोद याने प्लॅन आखला. यामध्ये विनोदने धुळ्यातील त्याचा जुना सहकारी जो मोगलाईत रहातो व वाहन चालकाचे काम करतो त्याला म्हणजे रोहित संजय गवळी याला सहभागी करून घेतले. शिवाय आपल्या व्यवसायात सहभागी असणाऱ्या हरियाणातील अमनसिंग आणि चरणसिंग या दोन्ही मित्रांना हरियाणा येथून बोलावून आपल्या प्लॅनमध्ये सहभागी करून घेतले. याशिवाय हरियाणातील इतर दोघांनाही मदतीला घेतले. निशाच्या मार्गदर्शनानुसार विनोदने प्लॅन आखला होता. विनोदसह सहा जण दि. २५ नोव्हेंबर २०२३ रोजी सायंकाळी धुळ्यात एकत्र आले होते. निशा फोनवरून विनोदच्या सतत संपर्कात होती. निशा आपल्या कुटुंबीयासमवेत ज्या आदर्शनगरात रहात होती. तेथून पळून जाणे निशासाठी अवघड होते, म्हणून तिने आपली आत्या ज्योत्स्ना पाटील हिचा आधार घेतला. निलेश पाटील कामानिमित्त बाहेरगावी गेले होते. ज्योत्स्ना आत्या घरी एकटीच होती. 'आत्या घरी एकटीच आहे. तिच्यासोबत झोपायला जाते' असं सांगून निशा ही ज्योत्स्ना आत्याकडे आली होती. रात्री दहा वाजता ज्योत्स्ना आत्याबरोबर जेवण करून निशा टी. व्ही. पहात बसली. मुद्दाम तिने टी. व्ही. चा आवाज मोठा केला. ठरल्याप्रमाणे रात्री साडेदहा वाजता विनोद आणि त्याचे सर्व सहकारी काळे कपडे परिधान करून व तोंडावर मास्क चढवून दौलत बंगल्याच्या मागच्या बाजूने आले. विनोद याने घराबाहेरची बेल वाजवली. निलेश पाटील हे गावाहून परत आले असावेत असे समजून ज्योत्स्ना आत्याने आतून दार उघडताच विनोदसह सर्व घरात शिरले. घराचा दरवाजा आतून बंद केला. घरात शिरताच विनोदने ज्योत्स्ना आत्याचे तोंड दाबून चाकूचा धाक दाखवत 'सोना कहाँ है, बताओ' असा दम दिला. इतर दोघांनीही सोबत आणलेल्या दोरीने तिचे हात- पाय बांधले व सोने ठेवलेल्या कपाटाच्या चाव्या मागून घेतल्या. घाबरून ज्योत्स्ना यांनी चाव्या दिल्या. त्या चाव्यांनी कपाट उघडून त्यातील ८० हजार ५०० रूपये किंमतीचे दागिने आपल्या पिशवीत टाकले. तसेच घाबरून एका बाजूला उभं रहाण्याचं नाटक करणाऱ्या निशाकडे बघत 'इस लडकी को भी साथ ले चलो' असं विनोद म्हणाला. त्याच्या साथीदारांनी निशाचे हात दोरीने बांधण्याचे नाटक करत तिला ढकलतच घराबाहेर आणलं. घरातील दिवे विझवून घराबाहेर उभ्या असलेल्या एम.एच.१८ बी. एफ. १३०१ क्रमांकाच्या गाडीत बसवले. त्या गाडीत सर्व बसून घटनास्थळावरून ते पसार झाले आणि ते सरळ मध्यप्रदेशातील रायपूर बारी येथे आले. रायपूर बारी येथे रोहित गवळी याने निशा शेवाळे आणि विनोद नाशिककर यांना उतरवून हरियाणातील अमनसिंग, चरणसिंग आणि इतरांना रतलाम रेल्वे स्टेशनला सोडले. त्यानंतर निशा आणि विनोद हे दोघे एम. पी. १३१ झेड बी ४२७० या क्रमांकाच्या वाहनाने मध्यप्रदेशातील शाजापूरला पोहोचले. तेथे गेल्यानंतर विनोदने निशाच्या वडीलांना फोन केला. त्यावेळी मोठाभाऊ शेवाळे यांनी निशाच्या अपहरणाची माहिती दिली होती. त्यावेळी त्याने सहानुभूती व्यक्त केली. विनोद हा निशाच्या शेजारी आदर्शनगरमध्ये रहात असतांना विनोदचे निशाच्या वडीलांशी संबंध जुळून आले होते. मोठाभाऊ हे विनोदला पुत्रवत मानत असत. त्याचा फोन आला की घरातील सर्व अपडेट सांगत असत. यावेळीही त्यांनी निशाच्या अपहरणाची माहिती त्याला दिली होती, पण त्यांना ठावूक नव्हते की जो आपल्याला फोन करत आहे, त्यानेच आपल्या मुलीला पळवून नेले आहे आणि पोलीस यंत्रणा शोध घेत आहे असे समजताच विनोदला घाम फुटला. पोलिसांनी हे प्रकरण शोधून काढले तर आपण दोघेही गोत्यात येवू, त्यापेक्षा तूच आपल्या वडीलांना फोन करून सांग की दरोडेखोरांनी मला इंदोरमध्ये आणून सोडले आहे, म्हणजे आपण दोघेही या संकटातून मुक्त होवू, असे तो म्हणाला. विनोदने पुढील परिणामाची कल्पना निशाला देताच तीही घाबरली आणि विनोदने सांगितल्याप्रमाणे करण्यास तयार झाली. विनोदने निशाला भाड्यासाठी व खर्चासाठी १५०० रूपये दिले आणि खाजगी बसमध्ये तिला बसवले. निशा इंदोर येथे उतरली आणि तेथून ती सेंधव्याला आली. ठरल्याप्रमाणे तिने तिच्या वडीलांना फोन केला. आपण सेंधव्याला असल्याचे तिने वडीलांना सांगितले. त्यानंतर पोलिसांच्या आदेशानुसार सेंधवा येथून सांगवी आणि तेथून पुढे साक्री पोलिसांनी तिच्या वडीलांना घेवून साक्री येथे आणले. आपल्या घरी आल्यानंतर निशाने आपल्या आईच्या मोबाईलवरून विनोदला फोन करून आपण सुखरूप साक्री येथे पोहोचल्याचे सांगितले. तू या प्रकरणात अडकू नकोस म्हणून तुझा मोबाईल फॉरमॅट करून टाक, अशी सुचना द्यायला ती विसरली नाही. अशा तऱ्हेने आपल्या प्रियकरासोबत पळून जाण्यासाठी दरोड्याचे केलेले नाटक पोलिसांनी आपल्या कौशल्याने उघडकीस आणले. पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अप्पर पोलीस अधीक्षक किशोर काळे, उपविभागीय पोलीस अधिकारी साजन सोनवणे, स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक दत्तात्रय शिंदे, साक्री पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मोतीराम निकम, पिंपळनेर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्रीकृष्ण पारधी यांच्या सतर्कतेमुळे दरोड्याचा हा बनाव उघडकीस आणला.

## दारूमुळे कुटुंबाची शोकांतिका ...

केल्याने खळबळ उडाली आहे. दारू पिणाऱ्या पतीसोबत वारंवार भांडणे होत असल्याने पत्नी घर सोडून गेल्याने आरोपीने हत्या केल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात आला आहे. हत्येच्या घटनेनंतर पोलिस घटनास्थळी दाखल झाले आहेत. आरोपीचे नाव अमित धर्मवारी बागडी असे असून तो काहीच व्यवसाय करत नाही. या हत्याप्रकरणात एक महिला व लहान मुलगा व मुलगी यांचा मृतदेह सापडला आहे. महिलेचे नाव भावना अमित बागडी, खुशी अमित बागडी (६ वर्ष) आणि मुलाचे नाव अकुंश अमित बागडी (८ वर्षे) असे आहेत. आरोपीने सततच्या भांडणातून त्यांच्या पत्नीची व दोन मुलींची हत्या केल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. आरोपीची पत्नी व मुलं त्याच्या सख्ख्या भावाकडे राहत होती. तर, आरोपीदेखील गेल्या तीन दिवसांपासून त्याच्याकडे राहायला आला होता. तेव्हाच त्याने तिघांची निर्घृण हत्या केल्याचे समोर आले आहे. आरोपीला दारू पिण्याचे व्यसन आहे. या त्रासाला वैतागून त्याची पत्नी मुलांना घेऊन त्याच्या सख्या लहान भावाकडे राहत होती. गेल्या तीन दिवसांपासून आरोपी भावना व दोन मुलांना भेटण्यासाठी म्हणून भावाच्या घरी आला होता व त्यांच्यासोबत राहत होता. आज सकाळच्या सुमारास आरोपीचा भाऊ नेहमीप्रमाणे सात वाजता त्याच्या हाउसकिपिंगच्या कामासाठी गेला होता. त्यानंतर जवळपास अकराच्या सुमारास घरी परतला. तेव्हा घरात भावना व दोन मुले मृतावस्थेत आढळून आले. भावना व दोन्ही मुलांना रक्ताच्या थारोळ्यात पाहून त्यांचा पायाखालची जमिनच हादरली. त्यांच्या मृतदेहाजवळ क्रिकेटची लाकडी बॅटदेखील आढळून आली. त्यानंतर त्याने तातडीने पोलिसांना फोन केला. पोलिसही घटनेचे गांभीर्य ओळखून पोलीस तातडीने घटनास्थळी पोहोचले. तसंच. प्राथमिक स्वरुपाची माहिती गोळा करुन पुढील तपासास सुरुवात केली आहे.

# आ. अभिमन्यू पवारांच्या प्रयत्नातून बेलकुंड एमआयडीसीला गती



**औसा/प्रतिनिधी**

औसा मतदारसंघात औद्योगिक विकास व्हावा यामाध्यमातून उद्योग व रोजगार निर्मितीला चालना मिळावी यासाठी आमदार अभिमन्यू पवार कायम प्रयत्नशील असतात याच अनुषंगाने एमआयडीसीमध्ये नवीन उद्योगांसाठी जागा शिल्लक नाही त्यामुळे अतिरिक्त एमआयडीसी निर्माण करणं अत्यंत गरजेचं आहे. बेलकुंड-चिंचोली सोन भागात राष्ट्रीय महामार्गालगत २०० -३०० हेक्टर जमीन उपलध होऊ शकते, त्याअनुषंगाने उद्योग विभागाने तपासणी करून योग्य तो निर्णय घ्यावा अशी मागणी त्यांनी केली होती. या मागणीनुसार तातडीने हालचाली सुरू झाल्या असून एमआयडीसी विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी औसा तालुक्यातील बेलकुंड-चिंचोली सोन परिसरात जागेची पाहणी केली. एमआयडिसी उभारणीच्या दुष्टीने सदरील जागा अनुकूल असल्याची सकारात्मक प्रतिक्रिया या पथकाने दिली असून संबंधित अहवाल लवकरच वरिष्ठ समितीसमोर दिला जाईल अशी माहिती एमआयडीसीच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती सोनाली मुळे यांनी दिली आहे. आमदार अभिमन्यू पवार यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत लातूर व अन्य ठिकाणच्या उद्योजकांनी औसा एमआयडीसीमध्ये नव्याने उद्योग उभारणी केल्यामुळे औसा एमआयडीसीमध्ये नवीन उद्योग उभारणीसाठी जागा शिल्लक राहिली नाही.त्यामुळे औसा तालुक्यातील नागपूर -रत्नागिरी राष्ट्रीय महामार्गालगत बेलकुंड - चिंचोली सोन याठिकाणी जागा उपलब्ध असून याठिकाणी अतिरिक्त एमआयडीसी उभारावी अशी मागणी उद्योगमंत्री उदय सामंत यांच्याकडे केली होती. यावर नागपूर येथील हिवाळी अधिवेशन संपल्यावर संबंधित जागेची पाहणी करण्याच्या सूचना त्यांनी एमआयडीसी विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिल्या होत्या. यानंतर २० डिसेंबर रोजी अधिवेशन संपताच २२ डिसेंबर रोजी आमदार अभिमन्यू पवार, एमआयडीसीच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती सोनाली मुळे, एमआयडीसी चे जनरल मॅनेजर बप्पासाहेब थोरात, प्रादेशिक अधिकारी अमित भामरे, औशाचे तहसीलदार भरत सूर्यवंशी, कार्यकारी अभियंता रमेश गुंड यांनी बेलकुंड -चिंचोली सोन येथील जागेची प्रत्यक्ष पाहणी केली.यावेळी सदरील जमीन एमआयडीसी उभारणीच्या दुष्टीने अनुकूल असून राष्ट्रीय महामार्ग, सोलापूर -तुळजापूर -धाराशिव नियोजित रेल्वे मार्ग या सर्व बाबीं सोईच्या ठरू शकतात अशी प्राथमिक माहिती यावेळी बोलताना सदरील विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली. औसा मतदारसंघात औद्योगिक विकास होत असताना नव्याने उद्योग उभारणीमधून मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होणार आहे.यामध्ये एमआयडीसी परिसरातील जमिनीचे भाव वाढतील इतर उद्योगांना भरभराटी येणार आहे. यासाठी स्थानिक पातळीवर लोकांनी सहकार्य करावे याठिकाणी लातूर जिल्ह्यासह पुणे, मुंबई येथील उद्योजकांना आपण उद्योग उभारणीसाठी घेऊन येवू एकंदरीत येथील एमआयडीसी उभारणीतून विकास होत असताना यामध्ये कोणी राजकारण आणू नये असे आवाहन यावेळी आमदार अभिमन्यू पवार यांनी केले आहे.

# अक्षताकलश यात्रेला लातुरात प्रतिसाद



**लातूर/प्रतिनिधी**

श्री राम जन्मभूमी तिर्थक्षेत्र अयोध्येतून अभिमंत्रीत केलेल्या अक्षता कलशाचे पूजन श्री जगदंबा मंदिरात शेकडो रामभक्तांच्या उपस्थितीत विश्व हिंदू परिषदेचे विभाग मंत्री अॅड सुजीत देशपांडे यांच्या हस्ते देवीची पुजा -आरती करुन अक्षता कलश शोभा यात्रेला प्रारंभ झाला. गंजगोलाई, हनुमान चौक, बस स्थानक या मार्गावरुन ही यात्रा महात्मा गांधी चौकातील श्री महालक्ष्मी मंदिरात पोहोचली. यावेळी श्री महालक्ष्मी मंदिर देवस्थानचे अध्यक्ष राजकुमार झिपरे, उपाध्यक्ष मल्लीकार्जुन घुगरे, पदाधिकारी मन्मथ हुच्चे, राजाभाउ भास्कर, रेवण टाके नारायण झिपरे यांनी शोभा यात्रेतील कलशाचे स्वागत केले. मंदिरा मध्ये श्री व सौ संदिप सुर्यवंशी, श्री व सौ सुमित पाटील यांनी सात कलाशाचे विधीवत पुजन करुन शहाराच्या विविध भागात दर्शनासाठी ते कलश त्या त्या विभागातील प्रमुख कार्यकर्त्याकडे सुपूर्द केले. यावेळी विश्व हिंदु परिषदेचे लातूर शहर महामंत्री रमण हजारे, प्रखंड प्रमुख, राजकीय पक्षाचे नेते, सामाजिक, धार्मिक संस्था, संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. शोभा यात्रेत विविध गणेश मंडळाचे, भजनी मंडळ, इस्कॉन आणि विविध देवस्थानचे पदाधिकारी सहभागी झाले होते. शोभा यात्रेच्या मार्गावर फटाक्यांची आतिषबाजी येत होती.

# भारतीय जनता युवा मोर्चा तालुकाध्यक्षपदी रामलिंग शेरे यांची सलग दुसऱ्यांदा फेरनिवड



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी तालुका भारतीय जनता युवा मोर्चाच्या तालुका अध्यक्षपदी रामलिंग शेरे यांची सलग दुसऱ्यादां फेरनिवड करण्यात आली. लातुर जिल्हाचे पालकमंत्री आ संभाजीराव पाटील निंलगेकर व युवा नेते अरविंद पाटील निंलगेकर यांचे हात बळकटीकरण करण्यासाठी व केद्रसरकार व राज्य सरकार यांच्या योजना जनसामान्यपर्यत पोहचवण्यासाठी, मा आ.संभाजीराव पाटील निंलगेकर व युवा नेते आरवींद पाटील निंलगेकर यांनी सलग दुसऱ्यादां रामलिंग शेरे यांची फेरनिवड केली आहे. तालुकाध्यक्ष काशिनाथ अण्णा गरिबे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रधान करण्यात आले.या निवडीचे अभिनंदन खासदार सुधाकर शृंगारे तालुका अध्यक्ष काशिनाथ गरिबे जेष्ठ नेते भगवान दादा पाटील माजी जिल्हा परिषद सदस्य प्रशांत पाटील, मनोहर पटणे, विजय मुके, राज गुनाले, शिवराज बिरादार, प्रशांत पाटील दवण हिप्पर्गेकर, बाळासाहेब बिरादार, बालाजी बिरादार, तुकाराम पाटील ईश्वर पाटील, रामभाऊ मोरे, पिंटू बोयने, ज्योतीराम बिरादार संगम पताळे आदीने अभिनंदन केले आहे.

# ट्रक व डम्परचे बनावट कागदपत्रे तयार करून विक्री करणाऱ्या टोळीला अटक

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**



स्थानिक गुन्हे शाखेस गोपनीय माहिती मिळाली होती की, जोगेश्वरी (पश्चिम) येथे राहणारा एक इसम हा गेले दोन ते तीन वर्षांपासून कागदपत्रांची मुदत संपलेल्या, मुंबई शहरामध्ये वापर करु शकत नाही, असे डंपर कमी भावामध्ये विकत घेवून, मुंबई मधील विविध गॅरेंजमध्ये नेवून, बॉडीमध्ये बदल करून, त्या डंपर वर बनावट इंजिन व चेसीस नंबर पंचिंग करुन, त्या बनावट इंजिन नंबर व चेसीस नंबरची अरुनाचल प्रदेश येथील आरटीओ मधून एनओसी प्राप्त करुन विरार -वसई परिवहन कार्यालयामध्ये नोंदणी करुन आरटीओ विरार-वसईचा नोंदणी क्रमांक प्राप्त करुन गरजुंना १२ ते १५ लाखामध्ये विक्री करीत आहे. या बातमीची शहानिशा केली असता, जोगेश्वरी, मुंबई येथे राहणाऱ्या दोन आरोपी इसमांच्या ताब्यात ०३ डंपर मिळून आले. त्यांच्याकडे त्यांनी ते डंपर कोठून खरेदी केले. त्या कागदपत्रांची मागणी केली असता, त्यांनी हे डंपर स्क्रॅपमधून कळंबोली येथून विकत घेवून, त्यामध्ये त्यांचा ओडीसा राज्यातील साथीदार याच्या मदतीने बनावट इंजिन नंबर व चेसीस नंबरची प्लेट व अरुनाचल प्रदेश आर. टी.ओ. येथील एन.ओ.सी. कुरीयरद्वारे प्राप्त करुन आणखी एक साथीदार रा. ठि. विजयवाडा, हैद्राबाद यास मुंबईमध्ये बोलावून स्थानिक गॅरेजमध्ये जुन्या डंपरची चेसीस नंबर व इंजिन नंबरची प्लेट बदलून बनावट इंजिन व चेसीस नंबर पंचिंग करीत असल्याचे सांगितले. त्यांनी दिलेल्या माहिती वरुन त्यांनी कळंबोली येथील ज्या लोकांकडुन जुने डंपर विकत घेतले त्या इसमांकडे चौकशी करण्यात आली व वर या इसमांकडून ताब्यात घेण्यात आलेले डंपर दाखविण्यात आले. त्यांनी सदर डंपरची पाहणी करून ओळखुन, त्यांनी विकलेल्या डंपर वरील चेसीस क्रमांक व इंजिन क्रमांक मध्ये फेरफार केल्याचे सांगितले. या प्रकरणी आंतरराज्यीय टोळी कार्यरत असल्याची खात्री झाल्याने, तिचा छडा लावण्यासाठी सखोल तपास करण्याची आवश्यकता वाटल्याने, शासनाच्या वतीने फिर्याद देवून गु.प्र.शा., गु.र.क्र. ८१/२०२३, कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४७४, ३४ भा.द.वि. अन्वये नोंद करून या गुन्हयामध्ये दोन इसमांना अटक करण्यात आली. यामध्ये अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे सिकंदर झरील शाह, वय ५० वर्षे, रमजान मेहबूब शेख, वय ३२ वर्षे अशी माहिती तपासात निष्पन्न झाली आहे. अटक आरोपीकडे केलेल्या चौकशीमध्ये त्यांनी अरुणाचल प्रदेश येथील परिवहन कार्यालयाची बनावट कागदपत्राद्वारे नोंदणी करण्यात आलेल्या डंपरची एन.ओ.सी. प्राप्त करून, त्या आधारे वसई-विरार परिवहन कार्यालयात डंपरची नोंदणी करुन वसई विरार परिवहन कार्यालयाचे नोंदणीचा नवीन क्रमांक मिळवून, १२ ते १५ लाख रुपयांनां सदर डंपर गरजवंताना विकल्याचे व त्यांची आर्थीक फसवणूक केल्याचे तसेच शासनाची फसवणुक केली असल्याचे निष्पन्न झाले. आता पर्यत अशा प्रकारचे १० डंपर अंदाजे किंमत १ कोटी २० लाख रुपये (१,२०,००,०००) तपासात जप्त करण्यात आले असून आणखी डंपर जप्त करीत आहोत. सदर गुन्हयाच्या तपासा दरम्याम इंजिन व चेसीसवर बनावट नंबर पंचिग करणाऱ्या इसमास तेलंगना राज्यातून अटक करण्यात आली आहे.

# रिक्षा चालकाने पोलिसांच्या मदतीने विसलेली सोन्याची बॅग महिलेला केली परत!

**कल्याण/प्रतिनिधी**



कल्याणमध्ये एका रिक्षा चालकाचा प्रामाणिकपणा समोर आला आहे. रिक्षातून प्रवास करताना एक महिला बॅग विसरली होती. या बॅगेत सोन्याचे दागिने होते. रिक्षा चालकाने महात्मा फुले पोलिसांच्या मदतीने ती बॅग त्या महिलेस परत केली आहे. महात्मा फुले पोलिसांकडून रिक्षा चालक मोहन राठोड याचा सत्कार करण्यात आला आहे. या बॅगमध्ये तब्बल सात तोळं सोनं होतं. ठाण्यात राहणारी नम्रता देशमुख ही महिला एका लग्न सभारंभासाठी मुरबाडला जाणार होती. त्या आधी त्या आपल्या नातेवाईकांना भेटण्याकरीता कल्याण पश्चिमेतील चिकणघर परिसरात जाणार होत्या. कल्याण रेल्वे स्थानकात लोकलमधून उतरुन नम्रता यांनी चिकनघरसाठी रिक्षा पकडली त्याच्या जवळ असलेल्या तीन बैगापैकी एक बॅग रिक्षातील सीटच्या मागे ठेवली. चिकनघर आल्यावर नम्रता दोन बॅग घेऊन खाली उतरल्या आणि नातेवाईकाकडे गेल्या. काही वेळाने त्यांच्या लक्षात आले की, त्यांची एक बॅग त्या रिक्षातच विसरल्या आहेत. नेमक्या रिक्षात विसरलेल्या बॅगेतच त्यांचे दागिने होते. नम्रता यांनी लगेचच महात्मा फुले पोलिस ठाणे गाठले. वरिष्ठ पोलिस निरिक्षक शैलेस साळवी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हवालदार मधाळे यांनी सीसीटीव्ही फुटेज तपासले. या सीसीटीव्हीत त्यांना रिक्षाचा नंबर सापडला. पोलिसांनी त्वरीत रिक्षा चालकास शोधून काढले. रिक्षा चालकाशी संपर्क साधला असता रिक्षा चालक मोहन राठोड याने प्रामाणिकपणे सांगितले की, ती बॅग रिक्षात आहे. मी ती बॅग परत करण्यासाठी महिलेला शोधत होतो. या दरम्यान तुमचा फोन आला. मी ही बॅग रिक्षा युनियनच्या कार्यालयात ठेवणार होतो. पोलिसांनी या घटनेची माहिती नम्रता यांना दिली. पोलिसांनी रिक्षा चालकाला पोलीस ठाण्यात बॅग घेऊन बोलवले. तसंच, नम्रता यांनाही बोलवून त्यांची त्यांना पोलिस त्यांची बॅग त्यांना सूपुर्द केली. तेव्हा नम्रता यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले. महिलने पोलिसांसह रिक्षा चालकाचे आभार मानले आहेत. तर प्रामाणिकपणा दाखवून बॅग परत केल्याप्रकरणी पोलिसांनी रिक्षाचालकाचा सत्कार केला आहे.




**राष्ट्रीय शेतकरी दिनानिमित्त आदर्श शेतकरी बाबुराव जाधव यांचा सत्कार शनिवार रोजी ग्रामपंचायत कार्यालय शेल्हाळ येथे मनोजभाऊ चिखले माजी पंचायत समिती सदस्य तथा शिवसेना तालुका प्रमुख उदगीर यांनी केले. यावेळी गावातील नागरिक भानुदास कोयले, अभंगराव देवनाळे, व्यंकटराव मोरे, तानाजी देवनाळे, दत्ता जाधव, धनाजी कोयले, विजयकुमार चिखले, बाळासाहेब मोरे, योगेश पुरी, ग्यानोबा जाधव, पी.वाय. पवार ग्रामसेवक व गावातील शेतकरी उपस्थित होते.**

# अहमदपूर येथे संत ज्ञानेश्वर विद्यालयात संत गाडगेबाबा यांची पुण्यतिथी साजरी!




**अहमदपूर/फिरोज शेख**

६७ वर्षापूर्वी आपल्या कीर्तनातून समाज प्रबोधन करणारे, राष्ट्रसंत, स्वच्छता संत डेबूजी झिंगराजी जानोरकर उर्फ संत गाडगेबाबा यांच्या पुण्यतिथीनिमित्त संत ज्ञानेश्वर प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात पाचवीच्या वर्गाकडून कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक आशा रोडगे तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्था समन्वयक कुलदीपजी हाके उपस्थित होते. प्रारंभी संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.यावेळी इयत्ता पाचवीतील विद्यार्थ्यांनी वर्गशिक्षिका प्राजक्ता भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली संत गाडगेबाबा यांच्या वेशभूषेतील जीवंत देखावा व गाडगेबाबांच्या जीवनावर आधारीत नाटिका सादर केली. सृष्टी कांबळे, तिगोटे श्रेया या दोन विद्यार्थिनींनी संत गाडगेबाबा यांच्या वेशभूषेत येऊन त्यांचे विचार व भजन गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला सादर केले. संकेत कदम व करण सावरगावकर यांनी स्वच्छते विषयी कविता सादर केली. त्यानंतर विद्यार्थ्यांना केळी वाटप करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. यावेळी माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका मीना तोवर, संगीता आबंदे, अर्चना जांभळदरी सुजाता बुरगे, अयोध्या जाधव, ज्ञानेश्वर चव्हाण सह विद्यार्थी, मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी पहिली ते सातवीतील विद्यार्थ्यांची संत गाडगेबाबा यांच्या जीवनावर प्रकाश टाकणारी भाषणे झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पाचवीच्या वर्गशिक्षिका प्राजक्ता भोसले यांनी केले. तर सूत्रसंचालन सतीश साबणे व आभार सविता पाटील यांनी मानले.

# कोरोनाच्या पार्श्वभूमीवर स्वतंत्र पथक नेमून शासकीय आरोग्य संस्थांमधील साहित्याची तपासणी करावी - मंत्री संजय बनसोडे

**लातूर/प्रतिनिधी**



काही राज्यांमध्ये कोरोनाच्या नवीन व्हेरियंटचे रुग्ण आढळून आले आहेत. जिल्ह्यात सध्या या व्हेरियंटचा एकही रुग्ण नसला तरी खबरदारीचा उपाय म्हणून आरोग्य यंत्रणेने सज्ज राहणे आवश्यक आहे. याकरिता जिल्ह्यातील सर्व शासकीय आरोग्य संस्थांमधील व्हेंटिलेटर, ऑक्सिजन सिलेंडरसह इतर उपलब्ध साधनसामग्रीची जिल्हास्तरीय पथकामार्फत तपासणी करण्याच्या सूचना क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी आज येथे दिल्या.

कोरोनाचा नवीन व्हेरियंट जेएन-वनचा प्रसार देशातील काही राज्यांमध्ये होत असल्याच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणेच्या सज्जतेचा आढावा घेण्यासाठी शासकीय विश्रामगृह येथे आयोजित बैठकीत ना. बनसोडे बोलत होते. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, लातूर शहर महानगरपालिकेचे आयुक्त बाबासाहेब मनोहरे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. एच. व्ही. वडगावे, विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे डॉ. उदय मोहिते, वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन जाधव यांची यावेळी उपस्थिती होती. कोरोनाच्या नवीन व्हेरियंटचे रुग्ण जिल्ह्यात आढळल्यास त्यावर उपचारासाठी आवश्यक साधनसामग्री, औषधी याचा पुरेसा साठा तालुकास्तरीय आरोग्य संस्थेतही उपलब्ध राहील, याची दक्षता घ्यावी. तसेच ऑक्सिजन सिलेंडरसह ऑक्सिजन प्लांटची सद्यस्थिती तपासून आवश्यक कार्यवाही तातडीने करावी. नागरिकांना या व्हेरियंटच्या अनुषंगाने अधिकृत माहिती देवून त्यांनी काय काळजी घ्यावी, याबाबत जनजागृती करावी, अशा सूचना ना. बनसोडे यांनी दिल्या. तसेच जिल्ह्यात सुरु असलेली प्राथमिक आरोग्य केंद्र आणि इतर आरोग्य संस्थांच्या इमारतींची कामे तातडीने पूर्ण करून त्या कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, असे त्यांनी सांगितले.

कोरोनाच्या नवीन व्हेरियंटच्या अनुषंगाने प्राप्त सूचनांनुसार जिल्हास्तरावर आरोग्य यंत्रणेचा आढावा घेण्यात आला असल्याचे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी सांगितले. तसेच या अनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी दिली. कोरोनाच्या नवीन व्हेरियंटच्या पार्श्वभूमीवर राज्यस्तरावरून आलेल्या सूचनांनुसार कार्यवाही सुरु असून याबाबत जिल्हास्तरावरही सातत्याने आढावा घेतला जात आहे. जिल्ह्यात सध्या या व्हेरियंटचा रुग्ण आढळून आलेला नसला तरी लक्षणे असलेल्या रुग्णांची कोरोना चाचणी करण्यासाठी कीट उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. कोरोना बाधित रुग्ण आढळल्यास त्याच्यावर उपचारासाठी आरोग्य यंत्रणा सज्ज असल्याचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. वडगावे यांनी सांगितले. तसेच जिल्ह्यात उपलब्ध आरोग्य साधनसामग्रीची माहिती त्यांनी यावेळी दिली. विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात कोरोनाच्या नवीन व्हेरियंटच्या उपचारासाठी ५० खाटा राखीव ठेवण्यात आल्या असून व्हेंटिलेटर, ऑक्सिजन यंत्रणा तपासणीसाठी मॉक ड्रील' घेण्यात आल्याचे डॉ. मोहिते यांनी सांगितले.

25 TO 31 DECEMBER 2023 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 12/23/2023 8:39 PM Page 1



# जरांगेचा बालहट्ट व हतबल सरकार!

कोणत्याही सरकार बहुमताचे असो किंवा अल्पमताचे, ते सरकार राज्यातील जनतेचे प्रतिनिधित्व करीत असते. सरकार चालवताना कोणत्याही अडचणी आल्या, तरी त्या अडचणींवर मात करण्यासाठी सरकारकडे अधिकार असतात. त्या अधिकाराचा सरकारने जर वापर केला नाही, तर राज्यात अशांतता माजू शकते. आणि त्यावर नियंत्रण मिळवणं सरकार किंवा सुरक्षा यंत्रणांना कठीण जाऊ शकत. आज महाराष्ट्रात जवळपास तशीच परिस्थिती आहे. एखाद्या विषयावर आंदोलन करण्याचा अधिकार लोकशाहीनेच दिलेला आहे. पण त्या आंदोलनाचा अतिरेक झाला तर तो अतिरेक मोडून काढण्याची जबाबदारीही सरकारची असते. पण दुर्दैवाने आज महाराष्ट्रात जे महायुतीचे सरकार आहे ते मराठा आंदोलनकर्त्या समोर इतके हतबल झाले आहे की त्यांची कीव करावीशी वाटते. मराठ्यांना आरक्षण द्यावे ही गेल्या अनेक वर्षापासूनची मागणी आहे. आणि त्यासाठी आंदोलने सुद्धा झाली. मराठा आरक्षण कृती समितीने जवळपास ५८ मोर्चे काढले शांततेने चर्चा पार पडल्या. परंतु आजच्या इतका आंदोलनाचा अतिरेक कधीच झाला नव्हता. आज जरांगे पाटलांनी मराठा आरक्षणाच्या नावाखाली जो संपूर्ण मराठा समाज एकत्र करून त्याच्या डोक्यात जे काही भरवले आहे. ते इतका भयंकर आहे की त्याचा जर स्पोट झाला तर महाराष्ट्राच्या प्रत्येक गावागावात जातीय दंगली घडतील. त्यानंतर मराठा आरक्षणाचा मुद्दा बाजूलाच राहील. आणि लोक जातीपातीच्या नावावर लोकांचा जीव घेतील. घरे दारे जालतील जे बहुसंख्याक आहेत ते गावागावातील अल्पसंख्याकांवर अत्याचार करतील. गावागावात खैरलांजी सारखी हत्याकांड घडतील. आणि तसेच झाले तर त्याला संपूर्ण जबाबदार महाराष्ट्र सरकार असेल. केवळ महाराष्ट्र सरकारच नव्हे तर कायद्यात बसत नसतानाही मराठा आरक्षण देणाऱ्या तात्कालीन काँग्रेस-राष्ट्रवादीच्या सरकार मधले लोकही त्याला जबाबदार असतील. एखादा समाज जेव्हा आपल्या ताकतीच्या जोरावर सरकारला वाकवण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा अशा दडपशाही समोर सरकारने झुकता नये. कारण सरकार कुठल्या एका समाजाचे नसते, तर सरकार संपूर्ण राज्यातील प्रत्येक जाती जाती धर्माच्या लोकांचे असते. सरकार संविधानातील कायद्याच्या तरतुदीनुसार चालत असते. अशावेळी एखाद्या समाजाने जर कायद्यात न बसणारी मागणी केली तर त्याच्यासमोर सरकारने गुडघे टेकता येत नाही. कारण तसे झाले तर प्रत्येक समाज सरकारला वेठीस धरेल आणि त्यानंतर जी परिस्थिती निर्माण होईल ती अत्यंत भयानक असेल. मराठा आरक्षणासाठी जरांगे पाटलांनी उपोषण केलं. त्यानंतर सरकारची चर्चा वगैरे झाली .इतपर्यंत सगळे ठीक आहे. पण जरांगेची प्रत्येक गोष्ट जर सरकार मानत असेल तर ती सरकारची हतबलता आहे. पहिली गोष्ट अशी की जरांगे पाटलांना मराठा आरक्षणाबाबत घटनेमध्ये तरतुदींचा अभ्यासच नाही. जरांगे पाटलांना संविधानातील आरक्षणाबाबत असलेल्या तरतुदींचा अभ्यास असता, तर त्यांनी अशी टोकाची भूमिका घेतली नसती. मुळात मराठा समाज हा आर्थिक दृष्ट्या सक्षम आहे असे गेल्या अनेक वर्षापासून चे चित्र आहे .आणि संविधानात जो आर्थिक दृष्ट्या कमजोर वर्ग आहे ,मग तो जातीच्या आधारे असो किंवा अन्य कोणत्या आधारे असो त्याला आरक्षण देण्याची तरतूद आहे .अशावेळी मराठा समाजातील काही टक्के लोकांचे मागासलेपण सिद्ध करून दाखवण्याची जबाबदारी सर्वच सरकारांची होती. पण काँग्रेस राष्ट्रवादी आघाडीचे सरकार असो, की युतीचे सरकार असो कुणीही ही जबाबदारी पार पाडली नाही. त्यामुळेच विधिमंडळात जरी मराठा आरक्षणाचा विधेयक पास झालं. किंवा मागासवर्ग आयोगाच्या अहवालावर मुंबई उच्च न्यायालयाने जरी मराठा आरक्षण मंजूर केले तरी सर्वोच्च न्यायालयात ते टिकले नाही. आता सर्वोच्च न्यायालयानेच मराठी मराठा आरक्षण नाकारले असेल तर त्याला सरकार काय करणार? राहता राहिला सवाल पूर्वीच्या दस्तावेजांमधील नोंदी तपासून मराठ्यांना कुणबी म्हणून प्रमाणपत्र दिले जाण्याची जी प्रक्रिया सुरू आहे. ती अत्यंत चुकीची असून न्यायालयात ही प्रमाणपत्र टिकणार नाहीत .त्यामुळे सरकार मराठा समाजाला काय म्हणून फसवते .आज बहुसंख्यांक असलेल्या मराठा समाजाची दोन्ही कडून फसवणूक चालू आहे .एकीकडे आरक्षणाचा अभ्यास नसलेल्या जरांगे पाटलांकडून मराठा आरक्षणाचा बालहट्ट सुरू आहे .तर दुसरीकडे मराठा समाजाच्या भीतीने सरकार जरांगे पाटलाचे बाल हट्ट पुरवीत आहेत. पण त्याचे परिणाम काय होतील याचा सरकारने विचार केला आहे का? सरकार कुठल्याही पक्षाच्या असो ,त्यांनी आंदोलनकर्त्यांचं म्हणणं ऐकून घ्यायला हवं. त्यांच्याशी चर्चा करायला हवी. पण आंदोलनकर्त्यांनीही कायदा समजून घ्यायला हवा. कायद्यातील तरतुदी समजून घ्यायला हव्यात आणि आंदोलन करते जर ते ऐकत नसतील आणि आपलं तेच खरं करणार असतील, तर सरकारने आपल्या अधिकाराचा वापर करून हे आंदोलन मोडून काढायला हवे. ती सरकारची जबाबदारी आहे. पण दुर्दैवाने जरांगे पाटलांसमोर सरकारी यंत्रणा इतकी झाली आहे की आज महाराष्ट्रात सरकार आहे की नाही तेच कळायला मार्ग नाही. आपल्या देशातील कायदा काय म्हणतो की, वारसा हक्क हा वडिलांच्या बाजूने मिळत असतो. आईच्या बाजूने नाही. ज्या विमल मुंदडा प्रकरणाचा अहवाला दिला जात आहे, त्यामध्ये सुद्धा घटस्फोटानंतर आईची बाजू ग्राह्य मानली गेली. पण जरांगे पाटलांना मात्र हे मान्य नाही. कुणबी प्रमाणपत्र देताना आई आणि वडील असा विचारच करू नये असं जरांगे पाटलांना वाटते. आणि सरसकट कुणबी पत्र द्यावीत अशी त्यांची मागणी आहे. पण हे शक्य आहे का? जरांगे पाटलांची ही मागणी जर चुकीची असेल आणि या मागणीसाठी ते सरकारला आणि महाराष्ट्रातल्या साडेबारा कोटी जनतेला भेटीस धरून इथलं वातावरण खराब करणार असतील, तर त्यांच्यावर सरकारने कारवाई करायला हवी. त्यांच्या वरील कारवाईनंतर जी परिस्थिती निर्माण होईल ती परिस्थिती पोलीस बळाच्या जोरावर हाताळायला हवी. कारण सरकारवर राज्यातील साडेबारा कोटी जनतेच्या वित्त आणि मालमत्तेची जबाबदारी आहे. त्यामुळे कुठल्याही एका समाजाच्या दबावाखाली सरकारने कोणताही निर्णय घेता नये. तसा जर निर्णय घेतला तर दुसऱ्या समाजाचे लोक सरकारला सोडणार नाहीत. स्वतःच सरकार टिकवण्यासाठी आणि मराठा समाजाची मतं मिळवण्यासाठी राज्यातील महायुती सरकारने जरांगे पाटलांच्या आंदोलनासमोर गुडघे टेकण्याचा प्रयत्न केला, तर त्याची भयांकर प्रतिक्रिया संपूर्ण महाराष्ट्रात उमटेल. सरकार कायद्याने चालते त्यामुळे सरकारने कायद्यातील तरतुदीनुसारच निर्णय घ्यायला हवेत. एखाद्या समाजाच्या दबावा पुढे कायदा मोडू नये. जर कायदा मोडणाऱ्या सामान्य माणसाला शिक्षा होत असेल, तर तोच कायदा मोडणाऱ्या सरकारलाही शिक्षा व्हायला हवी. ते सरकारने लक्षात ठेवायला हवे. मराठा आरक्षणाला महाराष्ट्रात कोणाचाही विरोध नाही. फक्त एवढंच की दुसऱ्या समाजावर अन्याय करून दुसऱ्या समाजातून त्याला आरक्षण देऊ नये. पण जरांगे पाटील हट्टाला पेटलेत कुणबी समाजातूनच आम्हाला आरक्षण हवे. असे त्यांचे म्हणणे हा केवळ बाल हट्टच नव्हे, तर दुराग्रह आहे. त्यामुळे सरकारने आता गप्प बसू नये. सरकारवर आता निर्णायक भूमिका घेण्याची वेळ आलेली आहे. उद्या जर असाच प्रकार ओबीसी समाजाने केला तर सरकार काय करणार आहे? आज ओबीसी समाजाचे सुद्धा अनेक ठिकाणी साखळी उपोषण सुरू आहे .पण सरकार मधला कुठलाही मंत्री किंवा आमदार तिकडे गेला नाही. पण जरांगे पाटलांच्या उपोषणाच्या स्थळी सरकार मधले मंत्रीच न्यायमूर्तींना घेऊन जातात. त्यांची मनधरणी करीत आहेत. महाराष्ट्राच्या आणि देशाच्या इतिहासात सुद्धा असा प्रकार कधीच घडला नव्हता. पण महायुतीमध्ये केवळ आणि केवळ सत्ता टिकवण्यासाठी आणि आपले घोटाळे लपवण्यासाठी सरकारमध्ये सामील असलेले लोक आज कोणाचीही पाय धरायला तयार आहेत. आज जरांगे पाटलांसमोर जे लोटांगण घातले जात आहे ते केवळ आणि केवळ सरकार मध्ये राहून आपले घोटाळे लपवण्यासाठी आणि सरकार टिकवण्यासाठी हा खटाटोप चाललेला आहे. पण महाराष्ट्रातील जनतेला हे अजिबात मान्य नाही. मराठ्यांना आरक्षण मिळायला हवे यात वादच नाही. कारण आजही मराठा समाजातील जवळपास ६० टक्के गरीब मराठा हलाखीचे जीवन जगतोय. ज्याच्याकडे दोन एकर पेक्षाही कमी शेती आहे. किंवा ज्याच्याकडे शेतीच नाही. उत्पन्नाचा कुठलं साधनच नाही. अशा मराठा समाजातील गोरगरीब मराठ्यांची बिकट स्थिती आहे. त्याला जरूर आरक्षणाचा लाभ मिळायला हवा. पण तो कायद्यानुसार. आणि त्यासाठी सर्वात प्रथम हा जो गरीब मराठा वर्ग आहे तो आर्थिक दृष्ट्या सक्षम नाही. ही बाब न्यायपालिकेला पटवून द्यायला हवी. आणि त्यांना कायद्याने आरक्षण मिळाले नाही तर जरासे पाटला सारखा कोणतरी एक येता. समाजाला एकत्र करतो. आणि धाकट दपशा दाखवून आपल्या मागण्या मान्य करण्यासाठी प्रयत्न करतो. हे महाराष्ट्र कदापी खपवून घेणार नाही. जितकी संख्या आज मराठ्यांचे आहे. तितकीच संख्या आज ओबीसी आणि इतर धर्मियांची आहे. त्यामुळे जरांगे पाटलांनी महाराष्ट्राला भीती दाखवू नये आणि सरकारनेही त्यांना घाबरू नये. आता जर सरकारने कठोर पावले उचलली नाही. तर येणाऱ्या निवडणुकीत हे महायुतीचे सरकार महाराष्ट्रातील जनता उघडून फेकल्याशिवाय राहणार नाही.

# साहित्यरत्न लोकशाहिर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ पूर्ण क्षमतेने सुरु नाविन्यपूर्ण योजना कार्यान्वित

**पालघर/प्रतिनिधी**

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळाची स्थापना ११ जुलै १९८५ रोजी झाली आहे. महामंडळाच्या भागभांडवलात भरघोस वाढ होऊन महामंडळाचे अधिकृत भागभांडवल १००० कोटी झाले आहे. मंजूर भागभांडवला पैकी सन २०२२-२३ व २०२३-२४ या दोन आर्थिक वर्षामध्ये प्रत्येक वर्षी १०० कोटी प्रमाणे २०० कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. यापैकी शासनाकडून १०० कोटी निधी प्राप्त झाला असून ३१ मार्च २०२४ पर्यत उर्वरित १०० कोटी प्राप्त होणार आहे. महामंडळा मार्फत खालील नमूद केल्याप्रमाणे नाविन्यपूर्ण योजना सुरु करण्यात येत आहे.

१) एन.एस.एफ.डी.सी.योजना : (राष्ट्रीय अनुसूचित जाती जमाती विकास महामंडळ नवी दिल्ली) या महामंडळाची मुदत कर्ज प्रकल्प मर्यादा रु.५,००,०००/, महिला समृध्दी योजना प्रकल्प रक्कम रु.४,४०,०००/-, लघुऋण योजना प्रकल्प रक्कम रु.१,४०,०००/- या तीन योजनेसाठी ३५०० लाभार्थी करिता रु.१०० कोटी निधी मागणीचे प्रस्ताव एन.एस.एफ.डी.सी. महामंडळास मान्यतेसाठी सादर केलेले आहे. एक महिन्यामध्ये निधी उपलब्ध करुन देण्याचे एन.एस.एफ.डी.सी.महामंडळाने मान्य केले आहे. मातंग समाजाच्या युवक, युवतीसाठी देशांतर्गत शिक्षणासाठी रु.३०,००,०००/- (तीस लाख मात्र) व परदेशांतर्गत शिक्षणासाठी रु.४०,००,०००/- (चाळीस लाख मात्र) कर्ज देण्याकरीताचे प्रस्ताव या महामंडळाच्या जिल्हा कार्यालयाकडुन मागविलेले असुन पात्र असलेल्या प्रस्तावास एन.एस.एफ.डी.सी. च्या निधीमधुनच मंजुरी देवून विद्यार्थ्यास शैक्षणिक कर्ज योजने अंतर्गत निधी उपलब्ध करुन दिला जाणार आहे.

१. थेट कर्ज योजना - प्रकल्प मर्यादा रु.१,००,०००/-(एक लाख) या योजने अंतर्गत सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात १२०७ लाभार्थ्यांना १२ कोटीचे कर्ज मंजूर केले असुन नोव्हेंबर अखेर ८०० लाभार्थ्यांना रु.८. कोटी रुपयाचे कर्ज वाटप केलेले आहे. तसेच २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये १६.५० कोटी ची तरतूद केलेली असून कर्ज मंजूरीची कार्यवाही चालू आहे.
२. बीजभांडवल योजना - सदर योजनेची प्रकल्प मर्यादा रु.७,००,०००/- (रु.सात लाख) असून यामध्ये महामंडळा मार्फत रु.१०,०००/- अनुदाना सहित २०% हिस्सा महामंडळामार्फत दिला जात होता परंतु लहुजी साळवे आयोग अभ्यास गटाच्या



१९ मंजुर शिफारशी पैकी क्र.०१ च्या शिफारशीच्याअनुषंगाने या योजने मध्ये महामंडळाचा हिस्सा २०% वरुन ४५% करण्यात आला आहे. सदर रक्कम ४% व्याजाने दिली जाते, लाभार्थीचा सहभाग ५% असुन उर्वरीत ५०% बँकेचे कर्ज असते. महामंडळाच्या हिश्याची रक्कम २०% वरुन वाढवुन ४५% केल्यामुळे बँकाकडुन कर्ज मंजुरी करीता वाढता प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे बहुसंख्य अर्जदारांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन महामंडळामार्फत करण्यात आले आहे.

३. शिष्यवृत्ती योजना - मातंग समाजातील विद्यार्थ्याकरीता लोकशाहीर अण्णा भाऊ साठे प्रोत्साहनपर शिष्यवृत्ती योजना राबविली जाते. त्यामध्ये प्रतिवर्षी १० वी,१२ वी, व पदवी मध्ये ६०% पेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना १० वी साठी १०००/-, १२ वी साठी रु.१५००/- देण्यात येत होते संचालक मंडळाच्या मान्यतेने चालू आर्थिक वर्षापासुन यामध्ये भरघोस वाढ करण्यात आली असून १० वी साठी रु.५०००/-, १२ वी साठी रु.७५००/- व पदवी व पदवीकासाठी रु.१०,०००/- पदव्युत्त साठी रु.१२,५००/-इतकी वाढ करण्यात आली असुन आगामी संचालन मंडळाच्या बैठकीत पुन्हा या रक्कमेमध्ये दुप्पट वाढ करण्याचा प्रस्ताव संचालक मंडळास सादर करण्यात येणार आहे.
४. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या धर्तीवर रु.३०,००,०००/-(रु.तीस लाख) प्रकल्प मर्यादा असलेल्या व्याज परतावा योजना या महामंडळास लागू करण्याबाबत शासनाकडे प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात येणार आहे.
५. थेट कर्ज योजना - सध्या महामंडळामार्फत रु.१,००,०००/- (एक लाख मात्र) प्रकल्प मर्यादा असलेली थेट कर्ज योजना राबविण्यात येते परंतु या रक्कमेमध्ये मोठे व्यवसाय करणे शक्य होत नसल्यामुळे योजनेची प्रकल्प मर्यादा रु.५,००,०००/- (रु.पाच लाख मात्र) पर्यत करण्याकरीता समाजाकडुन वारंवार मागणी होत होती त्या अनुषंगाने या योजनेची प्रकल्प मर्यादा रु.५,००,०००/- (रु.पाच लाख) पर्यत वाढविण्याचा प्रस्ताव शासनास सादर केलेला असुन राज्यशासनाकडुन या बाबतची मान्यता लवकरच मिळणार आहे.
६. लहुजी साळवे मातंग समाज आयोगाच्या शासनाने मंजूर केलेल्या ६८ शिफारशी पैकी १९ शिफारशी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळाच्या संबंधित आहे. या १९ असलेल्या शिफारशीमध्ये दोन टप्पे करुन पहिल्या टप्प्यातील नऊ शिफारशी करीता २३४ कोटी व उर्वरीत १० शिफारशी करीता रु.२२१ कोटी असे एकुण रु.४५५ कोटी इतका निधी मिळण्या करिता प्रस्ताव शासनास सादर केलेला असुन सदर प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन आहे.
७. अंधेरी मुंबई तसेच तुळजापुर जिल्हा उस्मानाबाद येथील जागे बाबत- मुंबई अंधेरी येथे ३८७ चौ.मी. महामंडळाच्या मालकीची जागा असुन या जागेवर अण्णाभाऊ साठे भवन व बहुउद्देशीय प्रशासकीय इमारत उभारण्याकरीता रु.५० कोटी तसेच जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांनी मातंग समाजाच्या युवक, युवतीसाठी विविध व्यवसायाचे प्रशिक्षण देण्याकरीता नगरपालिका, तुळजापूर यांच्या मालकीची १ एकर जागा या महामंडळास उपलब्ध करुन दिली असुन या जागेवर सुसज्य प्रशिक्षण केंद्र उभारणी करीता रु.५० कोटी निधी मिळण्यासाठी प्रस्ताव शासनास सादर केलेला आहे.
८. जाचक अटी शिथील करण्याचा प्रस्ताव- महामंडळामार्फत विविध कर्ज योजना राबविण्यात येतात कर्जाचे वितरण करताना दोन सक्षम जामीनदार शासन निर्णयात नमूद केल्यानुसार घेण्यात येतात जामीनदार घेण्याकरीताची जाचक अटी शिथील करण्याकरीता समाजातील कार्यकर्ते, सामाजिक संघटक व समाजबांधवाकडुन निवेदने प्राप्त झालेली आहेत. त्या अनुषंगाने जाचक अटी शिथील करण्यासंदर्भातील प्रस्ताव शासनास सादर केलेला आहे.

# मुद्रांक शुल्क व दंड सवलत अभय योजना २०23 लागू

**पालघर/प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासन मुद्रांक शुल्क व दंड सवलत अभय योजना २०२३ लागू केलेली आहे. ही योजना ३१ जानेवारी २०२४ प्रयन्त आणि १ फेब्रुवारी २०२४ ते ३१ मार्च २०२४ अशा दोन टप्प्यात लागू केलेली आहे. या योजनेमध्ये दि. १/१/१९८० ते दि. ३१/१२/२०२० या कालावधीत निष्पादित केलेले परंतु नोंदणीस दाखल केलेले किंवा न केलेले दस्त यांच्या बाबतीत देय होणाऱ्या तथा वसुली पात्र संपूर्ण मुद्रांक शुल्क आणि त्यावर लागू होणाऱ्या दंडामध्ये योजनेतील सूट/सवलत लागू करण्यात आलेली आहे. अशी माहिती सह जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी दिपक पाटील यांनी दिली आहे.

अशी असेल सूट / सवलत : दि. १ जानेवारी १९८० ते दि. ३१/१२/२००० या कालावधीतील दस्तांसाठी या योजनेच्या पहिल्या टप्प्यात (कालावधी दि. ३१ जानेवारी २०२४) देय होणारी मुद्रांक शुल्काची रक्कम १ लाख पर्यत असल्यास मुद्रांक शुल्क व दंडाची १००%संपूर्ण माफी, तसेच देय होणारी मुद्रांक शुल्काची रक्कम १ लाखावर असल्यास मुद्रांक शुल्कात ५० टक्के व दंडाची १००%संपूर्ण माफी.

या योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात (कालावधी दि. १ फेब्रुवारी२०२४ ते दि. ३१ मार्च २०२४) देय होणारीमुद्रांक शुल्काची रक्कम १ लाख पर्यत असल्यास मुद्रांक शुल्क व दंडाची ८० टक्के सूट, तसेच देय होणारी मुद्रांक शुल्काची रक्कम १ लाखावर असल्यास मुद्रांक शुल्कात ४० टक्के व दंडामध्ये ७० टक्के माफी.

दि. १ जानेवारी २००१ ते दि. ३१/१२/२०२० या कालावधीतील दस्तांसाठी या योजनेच्या पहिल्या टप्प्यात (कालावधी दि. १ डिसेंबर २०२३ ते दि. ३१ मार्च २०२४) देय होणारी मुद्रांक शुल्काची रक्कम २५ कोटीपर्यत असल्यास मुद्रांक शुल्कात २५ टक्के माफी व दंडाची रक्कम ही २५ लाखापेक्षा कमी असल्यास दंडामध्ये ९० टक्के माफी, तसेच दंडाची रक्कम ही २५ लाखापेक्षा जास्त असल्यास केवळ २५ लाख रक्कम दंड म्हणून स्विकारण्यात येऊन उर्वरित दंडाच्या रक्कमेत १००%माफी असेल तसेच देय होणारी मुद्रांक शुल्काची रक्कम २५ कोटीपेक्षा जास्त असल्यास मुद्रांक शुल्कात २० टक्के माफी तसेच दंडात १ कोटी स्वीकारण्यात




येऊन उर्वरित दंडाच्या रक्कमेत १००%सूट असेल.

या योजनेच्या दुराऱ्या टप्प्यात (कालावधी दि. १ फेब्रुवारी २०२४ ते दि. ३१/३/२०२४) देय होणारी मुद्रांक शुल्काची रक्कम २५ कोटीपर्यत असल्यास मुद्रांक शुल्कात २० टक्के माफी व दंडामध्ये ८० टक्के सूट तसेच दंडाची रक्कम ही ५० लाखापेक्षा जास्तअसल्यास केवळ ५० लाख रुपये रक्कम दंड म्हणून स्वीकारण्यात येऊन उर्वरित दंडाच्या रक्कमेत १००% सूट. तसेच देय होणारी मुद्रांक शुल्काची रक्कम २५ कोटी पेक्षा जास्त असल्यास मुद्रांक शुल्कात १० % माफी तसेच दंडात रु.२ कोटी रक्कम दंड म्हणून स्विकारण्यात येऊन उर्वरित दंडाच्या रक्कमेत सूट देण्यात येणार आहे. तसेच ज्याप्रकरणी शासनखाती जमा करावयाच्या मुद्रांक शुल्काची आणि त्यावरील दंडाची एकत्रीत रक्कम ही ५ कोटी आणि त्यापेक्षा अधिक असल्यास अशी सर्व प्रकरणे मुद्रांक जिल्हाधिकारी पालघर यांचे कार्यालयात सादर करावी.

या अभय योजना २०२३ चा लाभ घेण्यासाठी या कार्यालयामार्फत / दुय्यम निबंधक कार्यालयामार्फत ज्यांना मुद्रांक शुल्क भरणेकामी नोटीस प्राप्त झालेली आहे, त्यांनी या योजनेचा लाभ घेण्याकरिता आपला अर्ज सह जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, पालघर, जिल्हा मुख्यालय, नविन प्रशासकीय इमारत अ', कक्ष क्र.०९, तळमजला,पालघर-बोईसर रोड, कोळगाव, पालघर या कार्यालयास सादर करावा आणि शासनामार्फत सुरु करण्यात आलेल्या अभय योजना २०२३ अंतर्गत दंड सवलत योजनेच्या संधीचा नागरीकांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन मुद्रांक जिल्हाधिकारी दिपक पाटील यांनी केले आहे.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

क्राईम संध्या | सोमवार दि. २५ डिसेंबर २०२३ ते रविवार दि. ३१ डिसेंबर २०२३ | लातूर/पालघर/सोलापूर | www.crimesandhya.com | ५

# देवणीच्या शांतताप्रिय व सुसंस्कृत पणाच्या ओळखीस गालबोट लागू नये -गजानन शिंदे




**देवणी/शकील मनियार**

देवणी तालुका हा शांतताप्रिय असल्याचे मी ऐकून आहे.त्यामुळे आपल्या या शांतता व सुसंस्कृत पणाच्या ओळखीला गालबोट लागू नये याची सर्व जबाबदारी माझ्यासह तुम्हा सर्वावर आहे. त्यामुळे कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी आपल्या सर्वांचे सहकार्य अपेक्षित असल्याचे प्रतिपादन देवणी येथील पंचायत समितीच्या सभागृहात आयोजित शांतता समितीच्या बैठकीत बोलताना तहसीलदार गजानन शिंदे यांनी केले. गुरुवारी दुपारी पंचायत समितीच्या सभागृहात आयोजित या बैठकीत पूढे बोलताना तहसीलदार शिंदे म्हणाले मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी उभारलेल्या लढयाबाबत शासन सकारात्मक असून जरांगे पाटील यांनी दिलेली मुदत २४ डिसेंबर रोजी संपत आहे.त्या पार्श्वभूमीवर सकल मराठा समाजबांधवांनी हिंसक आंदोलनाचा मार्ग न स्विकारता शांतता राखावी त्यासाठी आपल्या सर्वाच्या सहकार्याची अपेक्षा असून आतापर्यत मराठा आरक्षणासाठी ५८ मोर्चे काढण्यात आले असून ते सर्व मोर्चे शांततेतच झाले आहेत. शिवाय जरांगे पाटील यांनीही शांततेतच आंदोलन करण्याचे आवाहन केले असल्याचे सांगून आपण सर्वांनी त्यासाठी पुढाकार घेण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले. यावेळी पोलिस निरीक्षक विष्णुकांत गुट्टे यांनीही कायदा व सुव्यवस्था कायम राखणे ही केवळ पोलिसांचीच जबाबदारी नसून समाजातील सर्व घटकांची आहे. त्यामुळे पोलिस प्रशासनास सहकार्य करण्याची विनंती उपस्थितास केली. यावेळी मराठा समाज बांधवांनीही आपल्या भावना व्यक्त करीत सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. बैठकीस तहसीलदार गणेश शिंदे, पोलिस निरीक्षक विष्णुकांत गुट्टे, जिल्हा बँकेचे संचालक दिलीप पाटील नागराळकर, उपनगराध्यक्ष अमित मानकरी, प्रा.अनिल इंगोले, अजित बेळकोणे, प्रशांत पाटील दवणहिप्परगेकर, सुग्रीव बिरादार, पोलीस नाईक फारुख सय्यद, साजीद शेख यांच्यासह सर्व पक्षीय नेते मंडळ अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक, बीट अंमलदार, पोलिस पाटील, सरपंच, पत्रकार, सकल मराठा समाज बांधवाबरोबरच इतर समाजातील नागरीकही मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आंदोलन करणारे, प्रश्न विचारणारे, कारवाई करणारे सर्व एकाच गटाचे कसे -मोनिका पानवे

**भिवंडी/प्रतिनिधी**



भिवंडी वाडा मनोर रस्त्याच्या दुरवस्थेवर आंदोलन करणारे, प्रश्न विचारणारी त्यावर उत्तर देणारे हे एकाच गटाचे असल्याने जिजाऊ कन्स्ट्रक्शन या रस्ते बांधकाम व्यावसायिक ठेकेदार कंपनीवर केलेली कारवाई ही राजकीय आकसातुन केल्याचा आरोप कंपनी भागीदार तथा जिजाऊ सामाजिक संस्थेच्या ठाणे जिल्हा अध्यक्षा मोनिका पानवे यांनी केला आहे.

१८ डिसेंबर रोजी भिवंडी वाडा मनोर रस्त्याच्या दुरवस्थे सह या भागातील इतर रस्ते अपूर्ण निकृष्ट बनविल्या प्रकरणी स्वाभिमान संघटनेच्या नेतृत्वाखाली रास्तारोको आंदोलन करण्यात आले.त्याच वेळी भिवंडी विधानसभेचे आमदार शांताराम मोरे यांनी विधानसभेत हा मुद्दा उचलून धरला, त्यावर उत्तर देताना सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम करणाऱ्या जिजाऊ कन्स्ट्रक्शन या कंपनी वर काळया यादीत टाकण्याची कारवाई करण्याची घोषणा केली. त्यावर मोनिका पानवे यांनी पत्रकार परिषद घेऊन आपली भूमिका स्पष्ट केली आहे. या रस्त्याची फक्त डागडुजी दुरुस्ती करण्याचे काम जिजाऊ कन्स्ट्रक्शन कंपनीला मिळाला होता. त्याचे काम नियमानुसार केले आहे. परंतु राजकीय हेतूने जिजाऊ संस्थेचे निलेश सांबरे यांनी सामाजिक शैक्षणिक आरोग्य क्षेत्रात केलेल्या निस्वार्थी सेवाकार्यामुळे त्यांना विविध समाज घटकातून उस्फुर्त प्रतिसाद मिळत असल्याने अनेक प्रस्थापितांच्या पाया खालची वाळू सरकू लागल्याने त्यांनी हे बेझुट आरोप केले आहेत असे स्पष्ट करीत येथील खासदार आमदार यांना जे जमले नाही ते काम निलेश सांबरे यांनी करून दाखवल्याने अनेकांच्या राजकीय अस्तित्वाला पणाला लागल्याने त्यांनी हे सर्व घडवून आणल असे मोनिका पानवे यांनी सांगितले. जर कारवाई करायचीच आहे तर भिवंडी वाडा मनोर रस्ता बनवीत असताना अनेक शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला मिळाला नाही, त्या रस्त्याचे काम करणाऱ्या ठेकेदाराची ,मानकोली खारबाव कामण या रस्त्याच्या दुरवस्थेची सुध्दा चौकशी करा, मानकोली खारबाव या रस्त्यावर सुध्दा अनेक अपघाती मृत्य नादुरुस्त रस्त्यांमुळे झाले आहेत तरी त्या रस्त्यावर टोल वसुली सुरू आहे त्याची सुध्दा एस आय टी चौकशी करा असा सवाल शेवटी मोनिका पानवे यांनी उपस्थित केला आहे.

# अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांनी घेतला क्रिकेट खेळण्याचा आनंद



**भिवंडी/प्रतिनिधी**

कोरोना काळात तब्बल साडेचार लाख नागरिकांना दोन महिने मोफत भोजन देऊन समाजकार्य आरंभलेल्या भिवंडी शहरातील धर्मराजा ग्रुप तर्फे भव्य क्रिकेट टुर्नामेंटचे आयोजन निलेश चौधरी यांनी धर्मराजा चषक नावाने केले आहे. या स्पर्धेचा उद्घाटन सोहळा मराठी सिनेअभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांच्या शुभहस्ते पार पडला. या प्रसंगी सोनाली कुलकर्णी यांना सुध्दा क्रिकेट खेळण्याचा मोह आवरता आला नाही. त्यांनी फलंदाजी करण्याचा आनंद घेताना जोरदार टोलेबाजी केली.

# वाड्यात प्रेरणादायी विचार सत्रांचे आयोजन

**वाडा/प्रतिनिधी**

रोटरी क्लब ऑफ वाडा आयोजीत उडान या अनोख्या उपक्रमाचे आयोजन वाडा तालुक्यातील शाळा, कॉलेज मध्ये करण्यात आले. २९ शाळा व कॉलेजच्या हजारो विद्यार्थ्यांचा सहभाग असणारा हा उपक्रम रोटरीच्या आजवरच्या सर्व उपक्रमापैंकी अनोखा होता. देशाच्या वेगवेगळ्या भागातून आलेली, विविध प्रांतातून आलेली विविध क्षेत्रात कार्यरत असणारी जवळपास ४० व्यक्तिमत्व तीन दिवसासाठी वाड्यात मुक्कामी होते. उडान या उपक्रमाअंतर्गत वाडा आणि परिसरात असणाऱ्या ग्रामीण भागातील शाळांमध्ये शिकणाऱ्या मुलांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी, एक-एक वक्ता शाळांमध्ये पाठवत मुलांशी संवाद साधण्याचा यशस्वी प्रयत्न रोटरी क्लब ऑफ वाडा तर्फे करण्यात आला. या उपक्रमाचे विशेष आकर्षण आंतरराष्ट्रीय कीर्तीचे जलतरणपटू, अर्जून पुरस्कार प्राप्त स्वप्निल पाटील यांनी वेगवेगळ्या शाळांना भेट देत उपक्रमात सहभाग नोंदवला. वाडा हा शेतकरी, आदिवासी बांधवांचा तालुका. निव्वळ संधीच्या अभावामुळे, संसाधनांच्या कमतरतेमुळे विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात येण्यात निर्माण होणारा अडसर दूर व्हावा, उपलब्ध संसाधनांचा वापर करून जीवनात यशस्वी होण्यासाठी त्यांना एकाच दिवशी प्रेरणादायी सेमिनार चे आयोजन हा या उपक्रमाचा मूळ हेतू. गेली तीन वर्षे रोटरी क्लब ऑफा वाडा हा उपक्रम राबवत आहे.



यावेळी या उपक्रमात रोटरी क्लब ऑफ वाडा बरोबरच मुंबई मधील रोटरी क्लब ऑफ बॉम्बे, बॉम्बे चेंबूर वेस्ट, बॉम्बे पिअर, मुंबई मुलुंड साऊथ, मुंबई वेस्टर्न एलाईट, वसई, बॉम्बे बांद्रा, चांदिवली मुंबई, मुंबई खार, नॉर्थ वेस्ट मालाड, मुंबई रोयाल्स, मनोर हायवे, बॉम्बे अपटाऊन, बॉम्बे बेव्ह्यू , मुंबई वेस्ट कोस्ट, पालघर, बॉम्बे महाकाली हाईटस, डहाणू सिकोस्ट, मुंबई दहिसर इत्यादी क्लब सहभागी झाले होते. उपक्रम यशस्वी करण्यासाठी डिस्ट्रिक्ट ट्रेनर अमित पाटील यांच्या मार्गदर्शना खाली अध्यक्ष शशिकांत दुर्गुडे, सचिव ऋषिकेश पाटील, समन्वयक शशांक ठाकरे आणि रोटरी क्लब ऑफ वाड्याच्या सर्व सदस्यांनी मेहनत घेतली. तर कोल्हापूर येथील विश्वजीत काशीद, सचिन कुंभोजे, अंजोरी कुंभोजे, डॉ. ऋषिकेश पोळ, प्रद्युम्न मगदूम यांनी परिश्रम घेतले.

# वकिलाच्या अल्पवयीन मुलाचे अपहरण

**कल्याण/प्रतिनिधी**

कल्याण येथील आधारवाडी भागात राहत असलेल्या एका वकील महिलेच्या अल्पवयीन शाळकरी मुलाचे बुधवारी सकाळी अज्ञात इसमांनी अपहरण केले. कल्याण पश्चिमेतील आधारवाडी भागातील चाणाक्य नगर भागात डव्होकेट हिमनील महेश पवार राहतात. त्यांचा १५ वर्षाचा मुलगा कल्याण मधील एका शाळेत शिक्षणासाठी सायकलवरून जातो. सकाळी साडे नऊ वाजता नेहमीप्रमाणे मुलाने आपल्या आईला मी शाळेत जात आहे, असे सांगून तो एकटाच सायकलवरून शाळेत जाण्यास निघाला. मुलगा नेहमीप्रमाणे शाळेत गेला असेल म्हणून पालक निश्चिंत होते. शाळा सुटल्यावर संध्याकाळी मुलगा घरी आला नाही म्हणून पालकांनी त्याचे मित्र, शाळेत चौकशी केली तेव्हा तो शाळेत नसल्याचे अपहृत मुलाच्या पालकांना समजल्यावर ते घाबरले. त्यांनी तात्काळ शाळा, कल्याण परिसरात मुलाचा शोध घेतला. तो आढळून आला नाही. मुलाचे अज्ञात इसमाने अपहरण केल्याचा संशय व्यक्त करून मुलाची आई डव्होकेट हिमनील पवार यांनी खडकपाडा पोलीस ठाण्यात तक्रार केली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक ए. एस. पवार या प्रकरणाचा तपास करत आहेत. पोलिसांनी विशेष तपास पथके तयार करून या प्रकरणाचा शोध सुरू केला आहे.

# दवणहिप्परगा ते अचवला रस्त्याची दुरावस्था



**देवणी/प्रतिनिधी**

दवणहिप्परगा ते अचवला या तीन किलोमीटरच्या रस्त्याची दुरवस्था झाली असून रस्त्यांवर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले गेल्याने वाहनधारकांना या रस्त्याने प्रवास करीत असताना मोठी कसरत करावी लागत आहे. दवणहिप्परगा ते अचवला हा महाराष्ट्र -कर्नाटकला सीमेला जोडणारा आंतरराज्य मार्ग असून या मार्गावर वाहनांची सतत वर्दळ राहत असते,कर्नाटकातील हुलसुर,केसर जवळगा, सायगाव, मेहकर, आट्रगा, माणकेश्वर यांसह परिसरातील अनेक गावातील शेतकरी शेतमाल उदगीर येथे विक्रीसाठी याच मार्गाने घेऊन जात असतात.त्यामुळे या मार्गावर नेहमीच वाहनांची रीघ लागलेली पाहायला मिळत असते. तसेच जागृती सह विविध साखर कारखान्याची उस वाहतूकही याच मार्गाने केली जाते. हा रस्ता उदगीर-निलंगा या महामार्गाला जोडला गेला आहे. मात्र या रस्त्याची गेल्या चार वर्षापासून मोठी दुरावस्था झाली असून रस्त्यांवर ठिकठिकाणी खड्डे पडल्याने एका बाजूने खोल तर दुसरीकडे चढ असा रस्ता झाला आहे.परिणामी अवजड वाहनधारकांना या मार्गावरून प्रवास करीत असताना कमालीची कसरत करावी लागत असल्याने चाळण झालेल्या या रस्त्याची दुरुस्ती करण्याची मागणी ग्रामस्थांतून केली जात आहे,तसेच रस्त्याच्या दोन्ही बाजूला रुंदीकरण करणे गरजचे असल्याने याकडे लोकप्रतिनिधी नी लक्ष घालून त्वरीत निधी मंजुर करून २०२४ च्या लोकसभा विधानसभा निवडणुकीपूर्वी या कामास सुरुवात करावीअशी मागणी जनतेतून केली जात आहे.

# कार व ट्रॅक्टरच्या अपघातात चौघे ठार

**औसा/प्रतिनिधी**



औसा शहरापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या साईप्रसाद हाटेल जवळ शिवलीहुन औशाकडे येणाऱ्या कारने ट्रक्टरला जोराची धडक दिली असून या अपघातात कार चालकासह कारमधील तीन शिक्षकांचा जागीच मृत्यु झाल्याची घटना शुक्रवारी मध्यरात्री एक वाजन्याच्या सुमारास घडली आहे. या अपघातात कारमधील पेशाने शिक्षक असलेले महेबूब मुजेवारखान पठाण (४५), जयप्रकाश मोतीराम बिराजदार जि. प. शाळा खरोसा (४५), संजय बाबूराव रणदिवे मुख्याध्यापक जिल्हा परिषद केंद्रीय शाळा खरोसा (५३) आणि कार चालक रा.राजेसाब नन्हु बागवान (३४) या चौघांचा जागीच मृत्यु झाला आहे. औसा - तुळजापूर राष्ट्रीय महामार्गावर ट्रॅक्टर-कारचा भिषण अपघात एवढा भिषण होता की कार चालकाने जवळपास १५० च्या स्पीडने गाडी चालवलेली असल्याचे प्रत्येक्ष दर्शनी नागरिकांनी सांगितले. दरम्यान कारचालकाचे गाडीवरुन नियंत्रण सुटल्याने हा विचीत्र अपघात झाल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांकडून वर्तविण्यात येत आहे. या अपघातानंतर भरधाव वेगात असलेल्या कारचे इंजिन ३० फुट अंतरावर जावून पडले आहे. घटनेची माहिती मिळताच औसा पोलीस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळाकडे धाव घेऊन अपघाताची प्राथमिक माहिती घेतली. दरम्यान पोलीस प्रशासन, रुग्णवाहिका आरोग्य कर्मचारी व नागरिकांना कारमधून मृतदेह बाहेर काढण्यात यश आले. औसा ग्रामीण रुग्णालयात मयताचे शवविच्छेदन करण्यात आले असून प्रेत नातेवाईकांच्या दाब्यात देण्यात आलेले आहे.

# गावठी पिस्तूल १० जिवंत काडतुसासह एकाला अटक




**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर शहरातील दमाणीनगर भागात गावठी पिस्तूल, १० जिवंत काडतुसे व कारसह साडेसात लाखांचा ऐवज यासह एकाला सोलापूर शहर गुन्हे शाखेने अटक केली आहे. मनोज विभीषण सुरेराव (वय ३८) असे अटक केलेल्या संशयीत आरोपींचे नाव आहे. सोलापूर शहर गुन्हे शाखेचे पथक आरोपींचा शोध घेण्यासाठी गस्त घालत असताना दमाणीनगर, लक्ष्मीपेठ येथे रोडलगत एक लाल रंगाची स्विफ्ट कार थांबल्याची गोपनीय माहिती मिळाली. पथकाने तेथे जाऊन कार मधील चालक मनोज सुरेराव याला ताब्यात घेऊन त्याची झडती घेतली असता, त्याच्या पॅन्ट मध्ये डाव्या बाजूस कमरेजवळ एक देशी बनावटीचे गावठी पिस्तूल खोचलेल्या अवस्थेत मिळून आले. तसेच त्याच्या पॅन्टच्या उजव्या खिशात १० जिवंत काढतूसे व सदर पिस्तूल ही विनापरवाना त्याने जवळ बाळगल्याने चौकशीत निष्पन्न झाले गावठी पिस्तूल दहा जिवंत काढतूस व कार असा ७ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुरेराव यांनी हे पिष्टल कशासाठी व कोणाला विक्रीसाठी आणले याचा अधिक तपास सुरू आहे. ही सदरची कारवाई सोलापूर शहर पोलीस आयुक्त डॉ. राजेंद्र माने, पोलीस उपायुक्त दिपाली काळे , सहाय्यक पोलीस आयुक्त प्रांजली सोनवणे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस संदीप पाटील, श्रीनाथ महाडिक व पोलीस अंमलदार अंकुश भोसले, विजयकुमार वाळके, अर्चना स्वामी, विद्यासागर मोहिते, गणेश शिंदे, सुभाष मुंढे, शैलेश बुघड आदींनी केली आहे.

# बनावट जन्म दाखल्याप्रकरणी महिलेसह दोघांवर गुन्हे दाखल

**नालासोपारा/प्रतिनिधी**

नालासोपारा येथे बनावट जन्म दाखला तयार केल्याचे एक प्रकरण उघडकीस आले आहे. याप्रकरणी आचोळे पोलिसांनी एका महिलेसह दाखला बनविणाऱ्यावर गुन्हा दाखल केला आहे. नालासोपारा येथील आचोळेमध्ये राहणाऱ्या यासीम वसीन खान या तरुणीने पारपत्रासंदर्भात आचोळे पोलीस ठाण्यात कागदपत्रे सादर केली होती. या कागदपत्रांची पोलिसांमार्फत पडताळणी केली जात असताना जन्म दाखला बनावट असल्याचा संशय पोलिसांना आला. या तरुणीचा जन्म आचोळे रुग्णालय असताना जन्मस्थळ मुंबई येथील महापालिकेचे रुग्णालय असल्याचे आढळून आले. याबाबत अधिक चौकशी केली असता हा दाखला बनावट असल्याचे कबूल केले. हा दाखला तिने नालासोपारा येथील शाहिन एण्टरप्रायझेस या दुकानातील फैय्याज शेख याच्याकडून बनवून घेतला होता. या प्रकरणी यासिन शेख आणि फैय्याज शेख यांच्या विरोधात आचोळे पोलीस ठाण्यात फसवणूक तसेच बनवाट दस्तावेज तयार केल्याप्रकरणी कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ३४ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपींनी आणखी कुणाचे अशा प्रकारचे दाखले तयार केले आहेत का त्याचा पोलीस शोध घेत आहेत.

# नागतिर्थवाडी येथे विकसित भारत संकल्प यात्रा संपन्न




**देवणी/प्रतिनिधी**

केंद्र शासनाच्या विविध योजना समाजातील वंचित घटकांपर्यत पोहचाव्यात, तसेच त्यांना या योजनांचा लाभ मिळावा, यासाठी विकसित 'भारत संकल्प यात्रा'ही विशेष मोहीम २४ नोव्हेंबर ते २६ जानेवारी २०२४ या कालावधीत लातूर जिल्ह्यात राबविली जात आहे. या मोहिमें अंतर्गत नगतिर्थवडी येथे हनुमान मंदिरा समोर दुपारी १ वाजता चित्ररथाद्वारे शासकीय योजनांची माहिती दिली गेली तसेच लाभार्थ्यांना विविध लाभांचे वितरण, नाव नोंदणी करणे, बि.पी. व शुगरची मोफत तपासणी करणे आणि गावातील नागरिकांचे आयुष्मान भारत कार्ड काढण्यात आले. विकसित भारत संकल्प यात्रेदरम्यान प्रधानमंत्री आवास योजना, जलजीवन मिशन, आयुष्मान भारत योजना, प्रधानमंत्री उज्ज्वला योजना, स्वच्छ भारत मिशन, कृषि विभागाच्या योजना, विश्वकर्मा योजना आदी योजनांची माहिती देण्यात आली. यावेळी गावच्या सरपंच कोमल राज गुणाले, माजी सरपंच राज गुणाले, तंटामुक्ती अध्यक्ष तुळशीराम गुणाले, आरोग्य विभागाचे समुदाय आरोग्य अधिकारी समर्थ होनखांबे, आरोग्य पर्यवेक्षक हरिश्चंद्र गायकवाड, आरोग्य सेविका शोभा सुरसे, प्रधानमंत्री आवास योजनेचे इंजिनियर अमोल काळे व गावातील महिला, पुरुष व शालेय विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वाडा पोलिसांनी केला गुटखा जप्त

**वाडा/प्रतिनिधी**



गुरुवारी (दि.२१ डिसेंबर) सायंकाळच्या सुमारास वाडा पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहिती नुसार वाडा शहरतील शास्त्रीनगरच्या रस्त्यावर एक टेम्पो संशयास्पद स्थितीत उभा असल्याने या टेम्पोची तपासणी केली असता टेम्पोत गुटख्याने भरलेल्या गोणी आढळून आल्या दरम्यान हा टेम्पो वाडा पोलिसांनी जप्त केला असून वाहन चालकास ताब्यात घेण्यात आले आहे. अशोक लेलँड कंपनीचा छोटा टेम्पो (क्र. डी.डी.०१ आर.९०८२) व गुटखा अशा एकूण १२ लाख पन्नास हजार रुपये किंमतीचा विमल गुटखा जप्त करण्यात आला आहे. दमण येथून आणलेला हा गुटखा ठाणे येथे विक्रीसाठी चालवला असल्याची माहिती तपास अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक सुहास खरमाटे यांनी दिली. तर वाहन चालक हसन जहांगीर याला शुक्रवारी न्यायालयात हजर केले असता २५ डिसेंबर पर्यत पोलीस कोठाडीत ठेवण्याचे आदेश मिळाले असल्याची माहिती मिळाली आहे.

# लग्न मोडल्याने तरुणीची आत्महत्या, त्रास देणाऱ्या तिघांविरोधात गुन्हा दाखल

**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापूर शहरातील होटगी रस्त्यावरील हत्तुरे वस्तीत राहणाऱ्या एका तरुणीचे लग्न मोडल्याने लग्नाच्या दिवशी तिने गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपविल्याची घटना सोमवारी पहाटेच्या सुमारास घडली आहे. सालिया मेहबूब शेख (वय २५) असे आत्महत्या केलेल्या युवतीचे नाव आहे. याबाबत तिचे वडील मेहबूब साहेबलाल शेख (वय ५२) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून समीर चांदसाब शेख, सलमान पिरसाब शेख, वसीम सैपन शेख यांच्याविरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सालिया शेख हिचे डी फार्मसी शिक्षण झाले. त्याचे वडील महापालिकेत सेवेला आहेत. तिला संशयित आरोपी समीर याने लग्नासाठी मागणी घातली होती. तेव्हा तिने त्यास नकार दिला होता. त्यामुळे त्याने तिचा वेळोवेळी पाठलाग करून तिच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला आणि आरोपी सलमान यांच्यामार्फत त्याला खाण्याचे पदार्थ पाठवून तिला शारीरिक व मानसिक त्रास दिला. दमदाटी करून आरोपीत त्याला ब्लॅकमेलिंग करत होते. त्यामुळे पाच डिसेंबर रोजी त्याच्या वडिलांनी या तिघांच्या विरोधात पोलिसांनी कारवाई करावी म्हणून विजापूर नाका पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. त्यावेळी पोलिसांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजकुमार वाघचवरे यांच्या मार्गदर्शनाखाली त्याच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई केली होती. दरम्यान तिचा विवाह विजयपूर येथील एका तरुणांशी ठरला होता. १८ डिसेंबर ही लग्नाची तारीख काढण्यात आली. सालियाचे सोमवारी लग्न होणार म्हणून दोन दिवसापूर्वीच घरासमोर मंडप पडल. रविवारी रात्री नियोजित वराकडील पाहुणे घरी आले. त्यावेळी वधूचे एडिट केलेले अश्लील



स्वरूपातील फोटो व व्हिडिओ आरोपीने त्याच्या नियोजित पतीच्या व्हॉट्सॲप वर पाठविले यावेळी मुलीचे अश्लील फोटो आमच्याकडे आले आहेत हा काय प्रकार आहे, असा प्रश्न वराकडील पाहुण्यांनी विचारत लग्न मोडत असल्याचे सांगितले. यामुळे आपल्या आणि आपल्या कुटुंबीयांची बदनामी झाली म्हणून त्या तरुणीने टोकाचे पाऊल उचलले त्याने सोमवारी पहाटे तीन ते साडेपाच च्या दरम्यान आपल्या खोलीतील पंख्याला ओढणीने गळफास घेऊन आत्महत्या केली. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर कुटुंबीयांना धक्का बसला संपूर्ण कुटुंब शोकाकुल झाले या घटनेची माहिती समजल्यानंतर विजापूर नाका पोलीस ठाण्यातील वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजकुमार वाघचवरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी ए.एम.गावडे यांनी घटनास्थळी धाव घेऊन तिचा मृत देहशवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठविला. यावेळी वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी घटनास्थळाला भेट देऊन तपासाला सुरुवात केली. याप्रकरणी तिघाविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त करणे व माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस निरीक्षक शिंदे हे करीत आहेत.

दरम्यान सालिया शेख हिला कुमठे येथील तिघा तरुणांकडून वारंवार त्रास देण्यात येत होता. त्याबाबत तिच्या कुटुंबीयांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात कारवाई करण्याबाबत तक्रारी अर्ज दिला होता. त्यावरून विजापूर नाका पोलीस ठाण्याकडून त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई केली होती, अशी माहिती विजापूर नाका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजकुमार वाघचवरे यांनी सांगितले.

## मंगळवेढा जवळ लाखोंचा गुटखा जप्त

सोलापूर : कर्नाटक राज्यातून मंगळवेढा मार्गे पंढरपूरकडे बेकायदा गुटखा घेऊन जाणारा महिंद्रा पिकअप वाहन मंगळवेढा शहरा जवळील पुलाजवळ पोलिसांनी पकडून १७ लाख २० हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी वाहन चालक संदीप रामचंद्र लाड (३६) वाहन मालक भूषण बाळासाहेब होमकर या दोघा विरुद्ध मंगळवेढा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कर्नाटकातील चडचण येथून बुधवारी सकाळी साडेसहा वाजण्याच्या दरम्यान पिकअप वाहन (एमएच १३ डीक्यू २६३९) हे बेकायदा गुटखा घेऊन येत असल्याची गोपनीय माहिती पोलीस निरीक्षक रणजीत माने यांना मिळाली होती. त्यांनी शहरात जवळील रिलायन्स पेट्रोल पंपाजवळ ब्रिजच्या खाली सापळा लावला व पथकाने येणाऱ्या वाहनाच्या चालकास थांबण्याचा इशारा केला यावेळी अन्नसुरक्षा अधिकारी यांनी वाहनांमध्ये काय आहे याबाबत विचारले असता विमल पान मसाल्याच्या पोते असल्याचे आरोपीने सांगितले. त्यानंतर सदरचे वाहन पोलिसांनी मंगळवेढा पोलीस ठाण्यात आणून लावले. यामध्ये १ लाख ९८ हजार रुपये किमतीचे पाच पोती विमल पान मसाला, २२ हजार रुपये किमतीची सुगंधित तंबाखू एक पोते, ७२ हजार रुपयांचा विमल पान मसाला, ६ लाखांची महिंद्रा गाडी असा एकूण १७ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे.

पान १ वरून...

### सासुरवाडीतील लोकांकडून सतत...

ज्ञानेश्वर घोसले आणि सुनील घोसले, बायको रेखा गोविंद पवार अशी मृतांची नवे आहेत. सासू रुखमा पंडित घोसले गंभीर जखमी असून त्यांच्यावर यवतमाळ जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेङ्गसासूवर हल्ला केल्यानंतर ती संपल्याचं जावयाला वाटलं आणि तो तिथून निघाला. पण या हल्ल्यात सासू रखुमाबाई घोसले या वाचल्या. त्या गंभीर जखमी असून त्यांच्यावर शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. जखमी सासू रुखमा पंडित घोसले हिची साक्ष कळंब पोलिसांनी नोंदविली आहे. यात तिने घडलेला सर्व प्रकार पोलीससमोर माडल्याचे उपविभागीय पोलीस अधिकारी संजय पूजलवार यांनी सांगितले. तिच्या साक्षीनुसार गुन्हाही नोंद करण्यात आला असून त्यादृष्टीने तपास सुरू केला आहे.

### कारचा धक्का लागल्याने वाद ...

जोरावर समोरच्या माणसाच्या मनात भीती निर्माण करायची आणि त्याला त्रास द्यायचा असे प्रकार सुरु झाले आहेत. पुण्याच्या हडपसरमध्ये गाडीचा हलकासा धक्का लागला. या शुल्लक कारणावरून एका टोळक्याने कार चालकाची हत्या केली तीही त्याच्या भाच्याच्या समोर. या घटनेने पुण्यातील हडपसरमध्ये खळबळ माजली असून पोलिसांनी आरोपीना अटक केली आहे.

कारचा धक्का लागल्याने झालेल्या वादातून दहा जणांच्या टोळक्याने कारचालकाचा दगडाने ठेचून खून केल्याची घटना हडपसर परिसरातील शेवाळवाडी येथे मंगळवारी रात्री घडली. या प्रकरणी तिघांविरुद्ध हडपसर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. अभिषेक संजय भोसले (वय ३०, रा. शेवाळवाडी, मांजरी, पुणे-सोलापूर रस्ता) असे खून झालेल्याचे नाव आहे. प्रकरणी विलास सुरेश सकट, कैलास सुरेश सकट, सचिन सकट यांच्यासह सात ते आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अभिषेक याचा भाचा अथर्व दादासाहेब साबळे (वय १८, रा. ऑर्चिड रेसिडन्सी, शेवाळवाडी, मांजरी) याने फिर्याद दिली आहे. शेवाळवाडी महादेवाच्या मंदिरासमोर ही घटना घडली. अभिषेक आणि त्याचा भाचा अथर्व कारमधून फुरसुंगी-चंदवाडी रस्त्यावरून मंगळवारी रात्री दहाच्या सुमारास जात होते. त्या ठिकाणी विलास सकट आणि कैलास सकट यांची किरकोळ भांडणे सुरू होती. थांबलेल्या कारला त्यांचा धक्का लागला. 'भांडणाचा राग माझ्या गाडीवर काढू नका,' असे अभिषेकने सांगितले. अभिषेक याच्या कारचा धक्का लागल्याने आरोपी विलास सकट याने त्याच्याशी वाद घातला. आरोपी सकट आणि साथीदारांनी अभिषेक आणि अथर्वला शिवीगाळ केली. टोळक्याने लोखंडी धारदार शस्त्र आणि दगडाने जबर मारहाण करून अभिषेकला गंभीर जखमी केले. अथर्वने मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला. तेव्हा आरोपींनी त्याला बेदम मारहाण केली. त्यानंतर आरोपी तेथून पसार झाले. गंभीर जखमी झालेल्या अभिषेकला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारांपूर्वीच त्याचा मृत्यू झाला होता. या घटनेची माहिती मिळताच पोलिस घटनास्थळी दाखल झाले. सहायक पोलिस निरीक्षक नानासाहेब जाधव आणि पथक पसार झालेल्या आरोपींचा शोध घेत आहे.

### जमिनीच्या वादामुळे रक्ताचे नाते ...

कपाशी वेचणी करत होते तर त्यांचा मुलगा प्रभाकर हा बाजुच्या शेतात काम करत होता. त्याचवेळी कैलास आपला मुलगा विशाल आणि सुन राजश्री अशा तिघांसह शेतात आला. त्याच्याजवळ कुट्टी भरण्यासाठी लागणारे लोखंडी दाते असलेले फावडे होते. वयोवृद्ध नाना बडगुजर शेतात कपाशीची वेचणी करत असतांना कैलास त्यांच्याजवळ आला आणि नेहमीप्रमाणे शेताच्या वाटणी वरुन वाद घालू लागला. तु एवढे कुणासाठी करतो अशा शब्दात कैलास याने पिताश्री नाना बडगुजर यांना म्हटले. त्यावर हे मी माझ्यासाठी करतो असे नाना बडगुजर यांनी मुलगा कैलास यास उत्तर दिले. त्यावर माझ्या हिश्श्याची जमीन माझ्या नावावर का करत नाही असा मुद्द्याचा प्रश्न कैलास याने वडील नाना यांना केला. शेतीच्या वाटणीचा मुद्दा पुढे येताच दोघांमधे शाब्दिक खडाजंगी सुरु झाली. या शाब्दिक वादाचे पर्यावसन लवकरच जीवे ठार करण्यात झाले. कैलास याने हातातील लोखंडी दाते असलेले कुट्टी भरण्याचे फावडे वडील नाना बडगुजर यांच्या डाव्या कानाजवळ जोरात मारले. त्यामुळे नाना बडगुजर हे जमीनीवर कोसळले. त्यांच्या डोक्यासह नाकातून व कानातून रक्त निघू लागले. हा प्रकार बघून कैलासचा मुलगा विशाल हा आजोबा नाना यांच्याजवळ धावून आला. विशाल याने त्याचे आजोबा नाना यांच्या शरिराला हात लावून पाहिला असता ते कोणतीही हालचाल करत नव्हते. आपल्या हातून वडीलांचा घातपात झाल्याचे लक्षात येताच कैलास हा शेंदुर्णी गावाच्या दिशेने पळून जाण्यात यशस्वी झाला. त्याचवेळी कैलासचा मुलगा विशाल याने बाजूच्या शेतात काम करत असलेले त्याचे सावत्र काका प्रभाकर यांना हाका मारुन बोलावले. विशाल याने काका प्रभाकर यांना सर्व घटनाक्रम कथन केला. प्रभाकर याने आपले वडील नाना हे रक्ताच्या थारोळ्यात पडल्याचे बघून आजुबाजूच्या लोकांना बोलावले. या घटनेची माहिती पहुर पोलिस स्टेशनला समजली होती. माहिती मिळताच पहुर पोलिस स्टेशनचे पो.नि. सचिन सानप हे आपल्या सहका-यांच्या सोबतीने घटनास्थळी दाखल झाले. नाना बडगुजर यांच्या मृतदेहाचा पंचनामा आटोपल्यानंतर तो उत्तरीय तपासणीकामी पहुर ग्रामीण रुग्णालयात रवाना करण्यात आला. विशाल बडगुजर याने आजोबा नाना बडगुजर यांच्या हत्येप्रकरणी वडील कैलास यांच्याविरुद्ध फिर्याद दाखल केली. त्यानुसार पहुर पोलिस स्टेशनला खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. भाग ५ गु.र.न. ४९/२३ भा.द.वि. ३०२ नुसार हा गुन्हा नोंद करण्यात आला. गुन्हा घडल्यानंतर फरार झालेल्या कैलास बडगुजर याच्या मागावर पोलिस पथक सज्ज होते. पोलिस निरिक्षक सचिन सानप यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उप निरिक्षक दिलीप पाटील, सहायक फौजदार शशिकांत पाटील, हे.कॉ. प्रशांत विरनारे, पो.कॉ. विजय पाटील व गोपाल गायकवाड आदींनी त्याचा माग काढत त्याला रात्रीच पाचोरा येथून ताब्यात घेत अटक केली. त्याने पोलिसांजवळ आपला गुन्हा कबुल केला. शेतीचा वाटणी हिश्श्याचा वाद एखाद्याच्या जीवावर कसा उठतो हे या घटनेतून दिसून येते. या घटनेचा पुढील तपास पोलिस निरीक्षक सचिन सानप करत आहेत.

### शुल्लक गोष्टीवरून दारूच्या पार्टीत...

झोपणे असा त्याचा नित्यक्रम होता. सकाळ पासून संध्याकाळपर्यत त्याला हमलीची मजुरी ही जेम तेमच मिळत होती. त्यात दारू पिऊन तो पैसे संपवत होता. दारू पिऊन समोरच्या माणसाला दादागिरी करणे. लोकांना दमदाटी करून त्याच्याकडून दारूसाठी पैसे मागणे अस तो करीत होता. कदमवाडी येथील लखन तमाम उर्फ समीर युनुस मणेर हा त्याचा मित्र होता. तो ही फिरस्त्या होता.हमालीचे काम करीत असल्याने त्याची व विनायकची चांगली ओळख झाली. ते दोघे ही दारू प्यायला एकत्र बसत होते. दारूच्या नशेत ते दोघे ही एकमेकांना शिव्या देणे,मारामारी करणे असे त्याच्या दोघांत होत होते. दारू पिल्याशिवाय त्या दोघांना चैन पडत नव्हती. दोघांचे ही हातावरचे पोट म्हणून त्यांना बारमध्ये जाऊन दारू पिणे परवडत नव्हते. म्हणून ते दोघे रात्रीच्या वेळी बंद दुकानाच्या बाहेर आडोशाला दारू प्यायला बसत होते. हल्ली ओपन बारमुळे दारूडया लोकांचे चांगले फावत असते. त्यातच सोडा वॉटर विकणाऱ्या गाडयावरची किंवा चिकनच्या गाडयावरची दारू प्यायला ते लोक देत असल्याने वाईन मधून बाटली घ्यायची आणि एखाद्या गाडयावरती जाऊन दारू प्यायची असे बरेच जण करीत असतात. त्यात दारू पिणाऱ्याचा आणि कोल्ड्रिंक विकणाऱ्याचा फायदा होत असल्याने ओपन बारची चलती लहान मोठया शहरातून वाढत आहे. खरे तर या ओपन बारचा त्रास हा सर्वसामान्य लोकांना होत असतो परंतु याकडे कुणी लक्ष देत नसल्याने त्याचे फावत आहे. विनायक आणि समीर मणेर दोघे ही मध्यवर्ती बसस्थानक जवळ असणाऱ्या उड्डाण पूलाच्या खाली असणाऱ्या रिकाम्या जागेत रोज रात्री दारू प्यायला बसत होते.त्या ठिकाणी रात्रीच्या वेळी एक इसम सोडा वॉटर कोल्ड्रिक विकण्याचा ढकल गाडा लावीत होता.तो दारू पिणाऱ्यांना कोल्ड्रिंक विकत होता.त्यामुळे तेथे दारू पिणांऱ्याची गर्दी होत होती.दारू पिणाऱ्यामुळे त्याचा ही धंदा होत होता. रात्री ८ ते ११च्या दरम्यान त्याचा धंदा हा तेजीत होता. जवळच परमीट रूम आणि वाईन शॉपी असल्याने पिणाऱ्याची चंगळ होत होती. सोमवार दि.१८ डिसेंबर २०२३ रोजी सकाळपासून विनायक लोढे याने हमालीचे काम केले असल्याने त्या दिवशी त्याला मजुरीचे पैसे ही बऱ्यापैकी मिळाले होते. त्यातच तो गेल्या दोन चार दिवसापासून तो आपल्या सदर बाजार येथील घरी ही गेला नसल्याने रात्री दारू ढोसायची आणि आपल्या घराकडे जायचे असा त्याने विचार केला. आज त्याच्या खिशात पैसे असल्याने दुपारपासून त्याने दारूने आपला घसा ओला केला होता. रात्री परत दारू प्यायचे म्हणून तो गिरीश वाईन शॉपी जवळ आला.त्याने वाईन शॉपीमधून क्वाटरच्या दोन बाटल्या घेतल्या. त्यातच तेथे त्यावेळी समीर मणेर हा त्याला भेटला. तो ही वाईन शॉपीमधून आपली क्वाटर घेतली. त्याचेबरोबर त्यावेळी समीरचे आणखीन दोन मित्र होते.ते ही दारू पिण्यासाठीच आले. विनायकला समीर भेटल्यावर त्या चौघांनी एकत्र दारू पिण्याचे ठरविले. ते चौघे ही गिरीश वाईन शॉपीजवळील बंद दुकानाच्या बाहेर अंधारात दारू प्यायला बसले.त्यावेळी अजून लोकांनी ये जा सुरू होती. परंतु पिणाऱ्या लोकांच्याकडे विनाकारण का लक्ष दयायचे म्हणून लोक त्याच्याकडे लक्ष न देता येत जात होता. ते चौघे ही ऐकमेकासमोर दारू प्यायला बसल्यावर दारू पिताना दारूत सोडा मिसळण्याची इच्छा झाली. त्यातच त्याने विनायकला जवळच असणाऱ्या सोडा वॉटरच्या गाडयावरून सोडा आणण्यास सांगितले. विनायकने दुपारपासून दारू ढोसली असल्याने त्याला नशा जास्त झाली होती. त्याने मी काही सोडा आणणार नाही तुझे तूच आण जा असे सांगितले. याचा राग समीर मणेर याला आला. रागाच्या भरात त्याने विनायकला शिव्या दयायला सुरूवात केली. त्यावेळी नशेत असणाऱ्या विनायक याने ही समीर याला आई वरून शिवी दिली. दोघांत भांडणे सुरू झाली. समीरने विनायकला लाथाबुक्कांनी मारायला सुरूवात केली. विनायक हा खाली पडून ओरडत होता.ते दोघे हाणामारी करता करता जवळच असणाऱ्या सोडयाच्या गाडयाजवळ आले. समीरने मागचा पुढचा विचार न करता सोडयाच्या बाटल्या उचलल्यां आणि झटकन विनायकच्या डोक्यात फोडल्या. त्यासरशी विनायकचे डोके फुटून तो जागीच पडला.त्याच्या डोक्यातून मोठया प्रमाणात रक्त स्राव सुरू झाला. तो ओरडत खाली पडला आणि त्याचा जागीच मृत्यू झाला. त्याला तेथेच टाकून समीर आणि त्याचे मित्र तेथून पळून गेले. ही घटना जवळच असणारा सोडा विक्रेता बघत होता. त्याने विनायकला सोडवायचा प्रयत्न केला परंतु समीर काही ऐकत नव्हता. तो समीर आणि विनायक या दोघांना ही चांगले ओळखत होता. रक्ताच्या थारोळ्यात विनायक लोंढे पडल्याचे बघून त्याची पाचावर धारण बसली. त्याने ही आरडा ओरडा करायला सुरूवात केल्यावर जवळच असणारे रिक्षा वाले ही धावत आले. एकाने विनायकला आपल्या रिक्षात टाकून सोडा विकणाऱ्याच्या मदतीने सीपीआर रुग्णालयात नेले. तेथील डॉक्टरांनी विनायकला तपासून त्याचा उपचारापूर्वीच मृत्यु झाल्याचे त्यांना सांगितले. या घटनेची माहिती सोडा विकणाऱ्याची बायको प्रतिभा विजय भोसले रा.लक्षतीर्थ वसाहत यांनी शहापुरी पोलीसांना दिल्यावर पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. घटनास्थळी रिकाम्या दारूच्या बाटल्या, सोडयाच्या बाटल्या, स्नॅक्स पडले होते. बाजुलाच रक्त पडले होते. पोलिसांनी पंचनामा करून या घटनेची माहिती सोडा विकणाऱ्याकडून घेतली. तसेच पोलीसांनी घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली. त्या फुटेज मध्ये सदरची घटना ही कैद झाली होती.एवढया माहितीवरून पोलीसांनी पळून गेलेल्या समीर मणेर याला कदमवाडी येथून ताब्यात घेऊन शाहुपुरी पोलीस स्टेशनला आणले.त्याच्याकडे या घटनेची चौकशी केली असता तो सुरूवातीला पोलीसांना उडवाउडवीचे उत्तरे देत होता. पोलीसांनी त्याला पोलीसी खाक्या दाखविताच त्याने आपला गुन्हा कबुल करून तो का? आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली. या घटनेची फिर्याद स्वत: पोलीसांनी दाखल केली. विनायक विश्वास लोढे (वय ३४) याच्या खून प्रकरणी समीर मणेर (वय ३५) याच्या विरोधात भा.दं.वी. कलम ३०२, प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला मा.कोर्टात उभे केले असता मा.कोर्टाने पाच दिवसाची पोलीस कोठडी मिळाली. या घटनेचा पुढील तपास शाहुपुरी पोलीस स्टेशनेचे पो.निरी. प्रमोद चव्हाण हे करीत आहेत. दारूच्या व्यसनाने कधी कोणच्या बाबत कोणती अघटित घटना घडेल हे काही सांगता येत नाही. नशे की बात खिसे म्हणून अनेकजण दारूच्या नशेत भरकटत असतात. त्यातूनच अशा घटना घडतात हे पाहयला मिळते.

पान ८ वरून...

### उपराष्ट्रपती यांची विडंबना करणाऱ्या ...

सुनीता टावरे, ओबीसी मोर्चा शहराध्यक्ष विठोबा बिल्ला नाईक, पदाधिकारी रेखा पाटील, ममता परमाणी, मोहन कोंडा, प्रवीण मिश्रा यांसह मोठ्या संख्येने भाजपा स्त्री पुरुष पदाधिकारी कार्यकर्ते सहभागी झाले होते. त्यांनी विरोधकांच्या या कृत्याचा घोषणाबाजी करीत राहुल गांधी व तृणमूल काँग्रसचे खासदार कल्याण बॅनर्जी यांच्या बॅनर वर जोडे मारीत ते पायदळी तुडवत तीव्र शब्दात धिक्कार केला आहे.

### ३४वा वसई तालुका कला क्रीडा ...

क्रीडा ज्योत विरार, नालासोपारामार्गे वसईच्या नरवीर चिमाजी आप्पा क्रिकेट मैदानात पोहोचेल. या ठिकाणी ३४ व्या वसई तालुका कला क्रीडा महोत्सवाचा उद्घाटन सोहळा सायं. ४.३० वाजता राजकीय नेते, प्रसिद्ध कलाकार, ज्येष्ठ क्रीडापटू पाहुण्यांच्या उपस्थितीत सुरू होईल. उद्घाटन सोहळ्यात प्रमुख उद्धाटक म्हणून भारतीय महिला क्रिकेट संघाच्या माजी कर्णधार श्रीमती डायना एडलजी, सुप्रसिद्ध ज्येष्ठ अभिनेते सुनील बर्वे आणि ज्येष्ठ दिग्दर्शक व अभिनेते चंद्रकांत कुलकर्णी यांची उपस्थिती लाभणार आहे. या मान्यवरांसह प्रमुख पाहुणे म्हणून वसई विरार शहर महानगरपालिकेचे आयुक्त अनिलकुमार पवार, आमदार क्षितिज ठाकूर, आमदार राजेश पाटील, माजी खासदार बळीराम जाधव, प्रथम महापौर राजीव पाटील, प्रथम महिला महापौर प्रविणा ठाकूर, माजी महापौर नारायण मानकर, रुपेश जाधव, प्रविण शेट्टी उपस्थित राहणार आहेत. या महोत्सवाचे प्रणेते आमदार हितेंद्र ठाकूर हे या सोहळ्याचे अध्यक्षपद भूषविणार आहेत.

**नव्या स्पर्धांचा समावेश** : यावर्षी महोत्सवात क्रीडा विभागात तिरंदाजी स्पर्धा, स्केटिंग स्पर्धा, रूबिक क्यूब स्पर्धा इत्यादी नव्या स्पर्धांचा समावेश करण्यात आला असून कुस्ती आणि दहिहंडी या क्रीडा प्रकाराची प्रात्यक्षिके सादर करण्यात येतील. यावर्षीच्या मॅरेथॉनमधील स्पर्धकांच्या छायाचित्र स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा या महोत्सवात होणार आहे. गेल्या महोत्सवात नव्याने सुरू केलेल्या बेस्ट फिजिक मेन्स आणि डान्स वसई डान्स या स्पर्धेला उत्तम प्रतिसाद मिळाला आहे. जलतरण (पोहणे) स्पर्धा तामतलाव येथील महानगरपालिकेच्या जलतरण तलावात होणार असून यावर्षी ८ वर्षांखालील आणि ६० वर्षांवरील असे दोन नवीन गट वाढवले आहेत. बास्केटबॉल ही स्पर्धा मधुबन कॉम्प्लेक्स, गोखिवरे येथील मैदानावर होणार आहे.

**कला व क्रीडा विभागात एकूण ७२ स्पर्धा** : विविध वयोगटात कला विभागात एकूण ३४ प्रकारच्या तर क्रीडा विभागात एकूण ३८ प्रकारच्या स्पर्धा होणार आहेत. क्रीडा विभागात कबड्डी, बॅडमिंटन, शरीर सौष्ठव, खो-खो, व्हॉलीबॉल, शुटींग बॉल, कराटे, टेबल टेनिस या स्पर्धा अत्यंत चुरशीच्या होत असतात. मास्टर दत्ताराम रंगमंचावर रंगणार्या शरीरसौष्ठव स्पर्धेत यंदाचा 'वसई श्री' या चषकाचा मानकरी कोण असेल? हे नेहमीच औत्सुक्याचे ठरते. यावर्षी या स्पर्धेत ५५ वर्षांवरील खेळाडूंसाठी विशेष गट करण्यात आला आहे. अशीच उत्सुकता सौंदर्य स्पर्धेतील 'मिस्टर पर्सनॅलिटी' व 'मिस पर्सनॅलिटी' या विजेतेपदासाठी पाहायला मिळते. न्यू इंग्लिश स्कूलमध्ये संपन्न होणार्या कला विभागातील एकांकिका, लोकनृत्य, रांगोळी इ. स्पर्धांना प्रेक्षकांची मोठी गर्दी असते.

यावर्षी सांघिक क्रीडा स्पर्धांमध्ये लक्षणीय वाढ झालेली आहे. कबड्डी-२५६ संघ, खो-खो ८६ संघ, लंगडी-८० संघ, लगोरी-५० संघ, व्हॉलीबॉल- ५१ संघ, शूटींगबॉल-८ संघ, थ्रो बॉल- ६ संघ, रिंग फुटबॉल- ६० संघ तर बास्केटबॉल स्पर्धेमध्ये ५६ संघ सहभागी होत आहेत. पारितोषिक विजेत्या कलावंत व क्रीडापटूंना एकूण ६२५० पेक्षा जास्त प्रमाणपत्रे, ८७० सुवर्ण, ८७० रौप्य, ८७० कांस्यपदके महोत्सवाच्या कालावधीत मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येतात. काही सांघिक स्पर्धांसाठी रोख बक्षिसांची तरतूद असते. कलाविभाग व क्रीडा विभागातील सर्वाधिक गुण प्राप्त करणार्या शाळा व संस्थांना स्वतंत्र चषक तर दोन्ही प्रकारात जास्त गुणांची कमाई करणार्या शाळेस वा संस्थेस सर्वसाधारण विजेतेपदाचा भव्य चषक (चॅम्पियनशीप ट्रॉफी) प्रदान करण्यात येणार आहे.

**मा. दत्ताराम रंगमंच व इतर ठिकाणी होणारे महोत्सवातील लक्षवेधी कार्यक्रम** : दि. २६ डिसेंबर २०२३ रोजी उद्घाटन समारंभ संपन्न झाल्यानंतर 'डान्स वसई डान्स' ही बॉलीवूड गीतांवरील नृत्यांची स्पर्धा होणार आहे. दि. २७ डिसेंबर २०२३ रोजी सायंकाळी नरवीर चिमाजी आप्पा मैदानावर यावर्षी प्रथमच कुस्ती स्पर्धेची प्रात्यक्षिके व दहीहंडी स्पर्धा खेळाची प्रात्यक्षिके होणार आहेत. दि. २८ डिसेंबर २०२३ रोजी सायं. ७.०० वाजता 'वसई श्री' व 'बेस्ट फिजिक मेन्स' या मानाच्या शरीरसौष्ठव स्पर्धा प्रेक्षकांच्या उदंड प्रतिसादात संपन्न होतील. दि. २९ डिसेंबर २०२३ रोजी सायं. ७.०० वाजता सौंदर्यस्पर्धा व फॅशन शो (पारंपरिक वेशभूषा) ह्या आकर्षक स्पर्धा संपन्न होतील. दि. ३० डिसेंबर २०२३ रोजी सायं. ७.०० वाजता नामवंत कलाकारांचा सहभाग असलेला मनोरंजनाचा कार्यक्रम सादर होणार आहे. महोत्सव कालावधीत अनेक सिनेकलावंत भेट देणार असून चित्रपटांचे प्रमोशन होणार आहे. दि. ३१ डिसेंबर २०२३ रोजी रात्रौ ९.०० वाजता मराठी-हिंदी सुमधुर गीतांच्या ऑर्केस्ट्राने महोत्सवातील सांस्कृतिक कार्यक्रमांची सांगता होईल.

**समारोप सोहळा** : दि. ३१ डिसेंबर २०२३ रोजी सायं. ६.०० वाजता महोत्सवाचा समारोप सोहळा असून या सोहळ्यात स्थानिक मान्यवरांसह वसई तालुका कला क्रीडा विकास मंडळाचे पदाधिकारी, अध्यक्ष वसईभूषण भाऊसाहेब मोहोळ, कार्याध्यक्ष हेमंत म्हात्रे, सुरेश वायंगणकर, प्रा. द. वि. मणेरीकर, मनोहर पाटील, रेमंड डिसिल्वा, जितेंद्र शहा, प्रकाश वनमाळी, संतोष वळवईकर, केवल वर्तक, विजय चौधरी, अनिल पी. वाझ, ज्यूड डिसोजा, लक्ष्मीकांत पाटील, सुबोध चौधरी, माणिक दोतोंडे इत्यादी मान्यवर या सोहळ्यात सहभागी होणार आहेत. ३४व्या महोत्सवात क्रीडा विभागातील सर्वोत्कृष्ट क्रीडापटूस 'स्व. डी. आर. राऊत (आप्पा) स्मृती चषक' तर सर्वोत्कृष्ट कलावंतास 'स्व. सतीश (नाना) वर्तक स्मृती चषक' प्रदान करण्यात येणार आहे. याशिवाय या वर्षभरात ज्या कलावंत, क्रीडापटू, साहित्यिक व पत्रकार यांनी राज्य, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर विशेष प्रावीण्य प्राप्त केले आहे, अशा वसई तालुक्यातील गुणवंतांचा विशेष सत्कार या महोत्सवाच्या कालावधीत करण्यात येणार आहे. कला विभागाच्या स्पर्धा न्यू इंग्लिश स्कूलमध्ये तर क्रीडा विभागाच्या स्पर्धा नरवीर चिमाजी आप्पा मैदान, समाज मंदिर व क्रीडा मंडळ सभागृहात होणार आहेत.

### महानगरपालिका परिवहन सभापतीपदी...

अवघ्या ४० दिवसांची मुदत आहे. त्यामुळे ही निवडणूक औटघटकेची आहे. वसई-विरार शहर महापालिकेत तत्कालीन लोकनियुक्त सभागृहाने अर्थात नगरसेवकांनी परिवहन समितीच्या १२ सदस्यांची नियुक्ती केली होती. महापालिकेच्या स्थायी समितीचे सभापती परिवहन समितीचे पदसिद्ध सदस्य असतात. आता स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने तथा समितीतील अन्य सहा सदस्य नियत कालावधीनुसार निवृत्त झाले असल्याने सध्या परिवहन समितीत केवळ सहा सदस्य आहेत. कोविड काळात सर्व स्थानिक संस्थांमधील समित्या खंडित करण्यात आल्या होत्या.

### गाव पाड्यातील मुलींनी जाणून...

सभापती किंवा जिल्हा परिषद अध्यक्ष पण होऊ शकते असा विश्वास यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष यांनी मुलींना दिला. तशी शपथ देखील मुलींकडून घेण्यात आली. मुलींनी देखील यास चांगला प्रतिसाद दिला. यावेळी ग्रामपंचायत,पंचायत समिती, जिल्हा परिषद, राज्य सरकार, केंद्र सरकार ही याबाबत ची माहिती अध्यक्षांनी मुलींना दिली. तसेच सर्व विभाग दाखवून कामकाज समजवण्याची सूचना अधिकाऱ्यांना दिली. यावेळी करोळ चे सरपंच नरेंद्र येले आणि आरोहण संस्थेचे पदाधिकारी पाड्यातील मुलींना जिल्हाच्या ठिकाणी घेऊन आले, याबद्दल अध्यक्षांनी आनंद व्यक्त केला.

25 TO 31 DECEMBER 2023 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 12/23/2023 8:42 PM Page 1



# आश्रमशाळेतील शेकडो विद्यार्थ्यांनी गिरवले सुदृढ मानसिक आरोग्याचे धडे

## लोकमाध्यम चॅरिटेबल ट्रस्टचा वाडा येथील आश्रमशाळेत उपक्रम





**वाडा/प्रतिनिधी**

सोशल मिडियाच्या अतिवापराचे दुष्परिणाम शालेय विद्यार्थ्यांवर होत असून यातून या चिमुकल्या जिवांचा मानसिक आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. संकटकाळात मनाचा तोल ढळू न देता मानसिक आरोग्य कसे सांभाळावे, याबाबत वाडा तालुक्यातील परळी येथील पद्मश्री अण्णासाहेब जाधव भारतीय समाज उन्नती मंडळाच्या परळी येथील माध्यमिक आणि उच्च माध्यमिक आश्रमशाळेत नुकताच एक दिवसीय शिबीर घेण्यात आले. इयत्ता सातवी ते १२ वीतील जवळपास ७०० विद्यार्थ्यांनी सुदृढ मानसिक आरोग्याचे धडे गिरवले. मुंबईतील लोकमाध्यम चॅरिटेबल ट्रस्ट आणि आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्ट यांच्या सहयोगाने हा उपक्रम राबवण्यात आला. कोरोना काळात भारतात ऑनलाईन शिक्षण पद्धतीचा अवलंब करण्यात आला होता. दोन वर्ष मोबाईलवरच विद्यार्थ्यांनी शिक्षण पूर्ण केले. मात्र आता तोच मोबाईल विद्यार्थ्यांसाठी धोकादायक ठरत आहे. मोबाईलच्या अतिवापराने विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य धोक्यात आल्याचे लोकमाध्यम चॅरिटेबल ट्रस्टच्या विश्वस्त श्रीमती लता परब यांनी यावेळी सांगितले. ग्रामीण भागातील विशेषत: आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांना स्मार्ट शिक्षणाबाबत लोकमाध्यम शाश्वत प्रयत्न करत असल्याचे श्रीमती परब यांनी सांगितले. त्याचाच एक भाग म्हणून माध्यमिक आणि उच्च माध्यमिक गटातील विद्यार्थ्यांना 'सायकॉलॉजिकल अँड माइंड हेल्थ' या विषयी सर्वांगिण माहिती देणारा उपक्रम हाती घेतला असल्याचे त्या म्हणाल्या. मागील दोन वर्षांपासून लोकमाध्यम ट्रस्टने ठाणे, पालघर आणि चिपळूणमधील शाळांसाठी विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य विषयावर काम केल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. या शिबीराची सुरुवात प्राचार्य विलास बंजारा यांच्या प्रास्ताविकाने झाली. ते म्हणाले की निवासी आश्रमशाळा असल्याने येथे विद्यार्थ्यांसोबतच राहावे लागते. अनेकदा विद्यार्थी टोकाची भूमिका घेतात, अशा वेळी त्यांना जर मानसिक आरोग्याविषयी किमान माहिती असेल तर ते कोणताही अविचारी निर्णय घेण्यापूर्वी वरिष्ठांशी किंवा पालकांशी संवाद साधू शकतात. आश्रमशाळेत पहिल्यांदाच मानसिक आरोग्याबाबत मुलांना तज्ज्ञांकडून मार्गदर्शन मिळाले याबाबत लोकमाध्यम ट्रस्ट, एम. पॉवर आणि सामाजिक कार्यकर्ते सचिन भोईर यांचे आभार मानले. आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्टच्या एम.पॉवर विभागाच्या सायकॉलॉजिस्ट मिहीका पालशेतकर आणि त्यांच्या टीमने 'सायकॉलॉजिकल अँड माइंड हेल्थ' विषयी इयत्ता ७ वे १२ मधील विद्यार्थ्यांचे २० सेशन्स घेतले. तणावात असताना कसे वागावे, चुकीच्या घटना घडल्यास त्यातून कसे बाहेर पडावे, रागावर नियंत्रण, मन:शांती अशा प्रकारच्या रोजच्या जीवनातील अनुभव आणि मनाचे अंतरंग यावेळी विद्यार्थ्यांनी जाणून घेतले.

# मोटार सायकल चोरी करणाऱ्या त्रिकुटास अटक; ६ मोटार सायकल केल्या हस्तगत




**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी शहरात मोटर सायकल चोरीच्या घटना वाढत असतानाच एका मोटर सायकल चोरीच्या गुन्ह्याचा तपास करीत असताना गुप्त बातमीदारा कडील माहितीच्या आधारे नारपोली पोलिसांनी तिघा मोटारसायकल चोरट्यांच्या मुसक्या आवळत त्यांच्या ताब्यातून दीड लाख रुपये किमतीच्या तब्बल सहा मोटर सायकल हस्तगत करण्यात यश मिळविले आहे.

पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार ८ डिसेंबर रोजी कामतघर परिसरातून श्रीकांत विजय दुडका यांची मोटर सायकल चोरीस गेली होती. या गुन्ह्याचा तपास करीत असताना नारपोली पोलिस ठाण्यातील गुन्हे प्रकटीकरण पथकास गुप्त बातमीदारामार्फत मोटर सायकल चोरीच्या गुन्ह्यातील आरोपींची माहिती मिळाली. नारपोली पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक भरत कामत, पोलीस निरीक्षक (गुन्हे) समाधान चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली नारपोली पोलीस ठाणे तपास पथक अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय मोरे, पोलिस उप निरीक्षक रोहन शेलार, पोलिस पथकातील सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक बी.एस. नवले, पोलिस राजेश पाटील, राजेंद्र सांबरे, अनिल पाटील, ठाकरे, प्रविण शिंदे, श्रीधर हुंडेकरी, जाधव, योगेश क्षिरसागर, बंडगर यांनी शांतीनगर परिसरातील नुर मोहम्मद रईस अहमद शाह वय २२ वर्षे या संशयितास ताब्यात घेऊन कसून चौकशी केली असता त्याने त्याचे साथीदार इम्तीयाज शाकीर शाह, वय १९ वर्षे, व हारून आलम सहीद अहमद अंन्सारी, वय १९ वर्षे यांना ताब्यात घेत या तिघा जणां कडे केलेल्या चौकशीत त्यांनी नारपोली पोलिस ठाण्यात दाखल एकूण सहा मोटर सायकल चोरीची कबुली दिली. या तिघा आरोपींना पोलिस कोठडी ठोठावण्यात आली असून त्यांच्याकडून अजून काही मोटर सायकल चोरीच्या गुन्ह्याची उकल होण्याची शक्यता पोलिसांनी वर्तविली आहे.

# नेहरोली ग्रामस्थांनी घेतला भंगार विक्रेत्यांच्या दुकानाला टाळे ठोकण्याचा निर्णय



**वाडा/प्रतिनिधी**

तालुक्यातील अनेक ठिकाणी भंगार व्यवसायिकांनी दुकाने थाटली आहेत या दुकानात चोरट्या लोखंडी वस्तू, शेतीसाठी लागणारे अवजारे, बोअरवेलच्या वायर व बोअरवेलचे साहित्य राजरोसपणे विकत घेतले जात आहेत. यामुळे तालुक्यात चोरीचे प्रमाण वाढले आहे. या प्रकरणी पोलिसांकडे अनेक वेळा तक्रारी केल्या आहेत. गावातील बेरोजगार तरुण भंगार व्यवसायाकडे ओढले जात आहेत तर काही तरुण चोऱ्या करून कारखानदारांना जेरीस आणत आहेत दररोज कुठे ना कुठे चोरी होतच आहे. विशेष म्हणजे शाळेचे दरवाजे, खिडक्या शालेय परिसरात लावलेल्या लोखंडी वस्तू तर गावामध्ये मोठ्या प्रमाणात चोरीचे प्रमाण वाढले होते. चोरीचा माल परिसरातील भंगारवाल्याकडे विक्री होत असल्याने अनेक बेरोजगार तरुण या धंद्याकडे वळले होते. अखेर नेहरोली ग्रामपंचायत व गावाच्या ग्रामस्थांनी एकत्र येऊन भंगार मालाच्या दुकानदारांना बोलावून ही दुकानेच बंद करण्यास सांगण्यात आले होते. भंगार विक्रेत्यांच्या दुकानातील भंगारसाठा रिकामा करण्यासाठी ग्रामपंचायतीने एक महिन्याची मुदत दिली असून हे धंदे कायमचे बंद करण्याचा ठराव नेहरोली ग्रामपंचायतीने मंजूर केला असून हद्दीतील सर्व भंगार विक्रेत्यांचे भंगार विक्रीचे दुकाने बंद करण्यास सांगितले असल्याची माहिती नेहरोली ग्रामपंचायतचे उपसरपंच प्रथमेश भाई ठाकरे यांनी दिली.

### वसईत स्नेहसंमेलन संपन्न

वसई न्यू इंग्लिश स्कूल माध्यमिक विभागाचे स्नेह संमेलन पार पडले. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध नृत्य प्रकार सादर केले गेले अत्यंत सुंदर असा हा सोहळा रंगला.

# अर्नाळा पोलीस ठाण्याच्या जप्त वाहनांना आग; बारा वाहने खाक



**विरार/प्रतिनिधी**

अर्नाळा पोलीस ठाण्याच्या नजिक सकाळी ८ वाजताच्या सुमारास जप्त केलेल्या वहानाना आग लागून नुकसान झाल्याची घटना घडली. सोमवारी घडलेल्या सदर घटनेत सुदैवाने कुणालाच ईजा झाली नाही. सदर पोलीस ठाण्यानजिक विविध गुन्ह्यात जप्त केलेली वहाने मुद्देमाल म्हणून जमा आहेत. यात चारचाकी वहानेही मोठ्या प्रमाणात आहेत. सकाळी अचानक या भंगार वहानाच्या गर्दीतुन धुर निघायला लागला. अल्पावधित इथल्या वहानानी पेट घेतला. ही आग इतकी भीषण होती कि नजिकच्या परिसरात पसरण्याची चिन्हे निर्माण झाली होती. यावेळी अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आल्याने पथकाची २ वहाने घटनास्थळी पोहोचली. त्यांनी एक तासात आगीवर नियंत्रण मिळवले. त्यामुळे मोठी दुर्घटना टळली. यात १२ वहाने जळून नष्ट झालेली आहेत. आगीचे नेमके कारण समजलेले नाही. तरी याबाबत माहिती घेण्याचे काम सुरु असल्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय पाटील यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले.

### अपघातात पिता-पुत्राचा मृत्यू

**वाडा/प्रतिनिधी**

वाडा तालुक्यातील केळठण येथे सकाळच्या सुमारास झालेल्या अपघातात दुचाकी वरील पिता-पुत्राचे दु:खद निधन झाले आहे. गोराड येथील राहणारे साहिल व सचिन हे दोघे पिता-पुत्र आपल्या स्पेंडर (क्र. एम.एच.०४ एल.के. ९२३४) या दुचाकीवरून शुक्रवारी (दि.२२ डिसेंबर) अकलोलीला जायला निघाले होते मात्र अगदी हाकेच्या अंतरावर असताना केळठण गावच्या हद्दीत आले असता समोरून भरधाव वेगात असलेल्या हायवाने धडक देऊन चाका खाली चिरडल्याने साहील सचिन वड (वय ९ वर्षे) याचा जागीच मृत्यू झाला आहे.तर गंभीर जखमी असलेल्या सचिन वड (वय ३० वर्षे) याला ठाणे येथे हलवले जात असताना त्याचा वाटतेच मृत्यू झाला आहे. त्यांच्या पश्चात दोन मुली व आई असा परिवार आहे. अपघातात पिता-पुत्रचा मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे तर हायवा चालका विरोधात संताप व्यक्त केला जात आहे.

# नेहरोली येथील आर्थिक व डिजिटल कार्यशाळेला महिलांचा उत्तम प्रतिसाद




**वाडा/प्रतिनिधी**

वाडा तालुक्यातील नेहरोली ग्रामपंचायत व हिंदुस्थान कोका-कोला यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा परिषद शाळा नेहरोली येथे महिलांच्या आर्थिक व डिजिटल सक्षमीकरणासाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. रविवारी (दि.१७ डिसेंबर) नेहरोली येथे हिंदूस्थान कोका-कोला कंपनी यांच्या सीएसआर निधी मधून वाय.फोर.डी फाउंडेशन यांच्या वतीने महिला आर्थिक व डिजिटल सक्षमीकरण कार्यशाळा घेण्यात आली. कार्यशाळा घेतल्या नंतर सरपंच संजना गिभल व उपसरपंच प्रथमेश ठाकरे व सदस्य यांच्या हस्ते महिलांना प्रमाणपत्र देण्यात आले. याचा फायदा महिलांना ऑनलाईन बँकिंग, बचत गट व शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी भविष्यात होईल. चंद्रशेखर पायघन (प्रोजेक्ट मॅनेजर) स्नेहल पाटिल यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम पार पडला त्यावेळी नेहरली गावच्या सरपंच संजना गिंबल, उपसरपंच प्रथमेश भाई ठाकरे, सदस्य अनन्या डोहाळे, अर्चना ठाकरे, दिया भुयाल, भीमा दिवा, वैष्णवी हाडेकर, वैशाली वजरे तसेच गावातील सर्व महिला बचत गटांच्या महिला उपस्थित होत्या.

# बेवारस मृताच्या वारसांचा शोध घेत आहेत विरार पोलीस



**विरार/प्रतिनिधी**

विरार पश्चिमेला रेल्वे स्टेशन लगत श्रेया हॉटेल जवळ रस्त्याकडेला एक अनोळखी पुरुष वय अंदाजे ४० ते ४५ वर्षे हा भिकारी तब्येत बरी नसल्याने एका रिक्षा चालकाने त्यास त्या अवस्थेत विरार ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. परंतु तेथील डॉक्टरांनी त्यास मृत घोषित केले. त्याच्या मृत्यूबाबत काही एक संशयाचा प्रकार नसून कोणाची तक्रार देखील नाही अशी खबर खबर देणार यांनी दिली. हा प्रकार दि. १० डिसेंबर २०२३ रोजी रिक्षा चालकाने विरार पोलिसांना दूरध्वनी दिली होती. त्या अनुषंगाने विरार पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू रजि. क्रमांक २५३/२०२३ कलम १७४ प्रमाणे नोंद करण्यात आली आहे. या छायाचित्रातील मयत पुरुषाच्या वारसांचा विरार पोलीस शोध घेत आहेत. मृत व्यक्तीच्या अंगावर मळकट राखाडी रंगाचा शर्ट आणि मेहंदी रंगाची फूल पँट आहे. या बेवारस मृत व्यक्तीस कुणी ओळखत असल्यास किंवा त्याच्याबाबत काही माहिती असल्यास विरार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास अधिकारी करत असलेले पोलीस उपनिरीक्षक आर.डी. बेलदार यांना आणि विरार पोलीस ठाणे यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.





सस्नेह नमस्कार,

३४व्या वसई तालुका कला-क्रीडा महोत्सवाचा उद्घाटन सोहळा **मंगळवार दि. २६ डिसेंबर २०२३** रोजी सायं. ४.३० वा.

☆ उद्घाटक ☆

**मा.श्रीमती डायना एडलजी** *(माजी कर्णधार, भारतीय महिला क्रिकेट संघ)*

**मा.श्री. अनिलकुमार पवार** *(आयुक्त, वसई विरार महापालिका)* **मा.श्री. राजेश पाटील** *(आमदार)* **मा.श्रीमती प्रविणा हितेंद्र ठाकूर** *(प्रथम महिला महापौर)*

यांच्या उपस्थितीत संपन्न होत आहे. सदर कार्यक्रमास मान्यवर अतिथी म्हणून

**मा.श्री. क्षितिज ठाकूर** *(आमदार)* **मा.श्री. बळीराम जाधव** *(माजी खासदार)*

**मा.श्री. प्रविण शेट्टी** *(माजी महापौर)* **मा.श्री. रूपेश जाधव** *(माजी महापौर)* **मा.श्री. नारायण मानकर** *(माजी महापौर)* **मा.श्री. राजीव पाटील** *(प्रथम महापौर)*

उपस्थित राहणार असून कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान यंग स्टार्स ट्रस्टचे अध्यक्ष

**लोकनेते आमदार मा.श्री. हितेंद्रजी ठाकूर**

भूषविणार आहेत. तरी सदर सोहळ्यास आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

**महोत्सव कार्यक्रम पत्रिका**

**मंगळवार दि. २६ डिसेंबर २०२३** रोजी दुपारी २.३० वाजता **मा. आमदार क्षितिज ठाकूर** यांच्या हस्ते क्रीडा ज्योतीचे प्रज्वलन विरार येथील स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या पुतळ्याजवळ होणार आहे.

☆ उद्घाटन सोहळा ☆

**स्थळ : मास्टर दत्ताराम रंगमंच, नरवीर चिमाजी अप्पा मैदान, वसई**

ईशस्तवन व स्वागतगीत ☆ पाहुण्यांचा परिचय व स्वागत ☆ संचलन ☆ महोत्सव ज्योतीचे आगमन व प्रज्वलन ☆ ध्वजारोहण ☆ महोत्सवाचे औपचारिक उद्घाटन शपथविधी ☆ आयोजकांचे प्रास्ताविक ☆ गुणीजनांचा सत्कार ☆ पाहुण्यांचे मार्गदर्शन ☆ आभार प्रदर्शन

सायं. ७.०० वा. **कला-क्रीडा स्पर्धांना प्रारंभ** ● **एकांकिका स्पर्धेचे उद्घाटन** *(न्यू इंग्लिश स्कूल)* ● **विविध क्रीडास्पर्धांचे उद्घाटन**

**रंगावली व हस्तकला प्रदर्शनाचे उद्घाटन**

रात्रौ ८.०० वा. **डान्स वसई डान्स - बॉलिवूड नृत्य स्पर्धा**

**बुधवार दि. २७ डिसेंबर २०२३**

सकाळी ७.०० वा. वैयक्तिक मैदानी स्पर्धांना सुरुवात *(नरवीर चिमाजी अप्पा मैदान)*
सकाळी ९.०० वा. विविध कला स्पर्धांना सुरुवात *(न्यू इंग्लिश स्कूल)*
दुपारी ३.०० वा. ज्येष्ठ नागरिक कलाविष्कार
सायं. ४.०० वा. सॅलड डेकोरेशन *(न्यू इंग्लिश स्कूल)*
सायं. ६.०० वा. विविध वेशभूषा स्पर्धा *(मा. दत्ताराम रंगमंच)*
सायं. ६.३० वा. दहीहंडी स्पर्धा प्रात्यक्षिके
रात्रौ ८.०० वा. कुस्ती स्पर्धा प्रात्यक्षिके

**गुरूवार दि. २८ डिसेंबर २०२३**

सायं. ४.०० वा. पुष्परचना स्पर्धा *(न्यू इंग्लिश स्कूल)*
सायं. ४.३० वा. कला व क्रीडा स्पर्धांचा बक्षीस समारंभ *(क्रीडा भवन रंगमंच)*
सायं. ५.०० वा. लोकनृत्य *(न्यू इंग्लिश स्कूल)*
सायं. ७.०० वा. शरीरसौष्ठव स्पर्धा वसई श्री व मेन्स फिजिक स्पर्धा *(मा. दत्ताराम रंगमंच)*

**शुक्रवार दि. २९ डिसेंबर २०२३**


सायं. ४.०० वा. पाककला स्पर्धा *(न्यू इंग्लिश स्कूल)*
सायं. ४.३० वा. कला व क्रीडा स्पर्धांचा बक्षीस समारंभ *(क्रीडा भवन रंगमंच)*
सायं. ६.०० वा. मूकाभिनय स्पर्धा *(न्यू इंग्लिश स्कूल)*
सायं. ७.०० वा. ग्रुप फॅशन शो व मि. अँड मिस पर्सनॅलिटी *(नरवीर चिमाजी अप्पा मैदान)*

**शनिवार दि. ३० डिसेंबर २०२३**

सकाळी ९.०० वा. प्रश्न मंजुषा स्पर्धा *(न्यू इंग्लिश स्कूल)*
सकाळी ९.३० वा. भजन स्पर्धा *(न्यू इंग्लिश स्कूल)*
दुपारी २.०० वा. पथनाट्य स्पर्धा *(न्यू इंग्लिश स्कूल)*
सायं. ४.०० वा. मेंदी स्पर्धा *(न्यू इंग्लिश स्कूल)*
सायं. ४.३० वा. कला व क्रीडा स्पर्धांचा बक्षीस समारंभ *(क्रीडा भवन रंगमंच)*
सायं. ७.०० वा. लघुचित्रपट प्रदर्शन *(न्यू इंग्लिश स्कूल)*
सायं. ७.०० वा. मनोरंजनाचा कार्यक्रम

**रविवार दि. ३१ डिसेंबर २०२३**

सकाळी ९.०० वा. प्रश्नमंजुषा स्पर्धा *(न्यू इंग्लिश स्कूल)*
सकाळी १०.०० वा. वादविवाद स्पर्धा *(न्यू इंग्लिश स्कूल)*
सायं. ६.०० वा. समारोप सोहळा *(मा. दत्ताराम रंगमंच)*
☆ ईशस्तवन व स्वागतगीत
☆ आयोजकांचे प्रास्ताविक
☆ पाहुण्यांचा परिचय व स्वागत
☆ पाहुण्यांचे मार्गदर्शन
☆ पारितोषिक वितरण समारंभ
☆ ध्वजावतरण व महोत्सव ज्योतीचे शमन
सायं. ८.०० वा. मराठी-हिंदी सुमधूर गीतांचा ऑर्केस्ट्रा *(मा. दत्ताराम रंगमंच)*




# सर्वोत्कृष्ट तपास करणाऱ्या ५ पोलीस अधिकाऱ्यांचा आयुक्तांकडून गौरव!

**मिरा-भाईंदर/प्रतिनिधी**

मीरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयातील ५ पोलीस अधिकाऱ्यांना नोव्हेंबर महिन्यातील सर्वोत्कृष्ट तपासाचा (बेस्ट डिटेक्शन) पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. विशेष म्हणजे, विरार पोलिसांना नोव्हेंबर महिन्यात दोन प्रकरणात सर्वोत्कृष्ट तपासाचा पुरस्कार मिळाला. दर महिन्यात सर्वोत्कृष्ट तपास करणार्या पोलीस अधिकार्याला पोलीस आयुक्तांकडून गौरविण्यात आले. नोव्हेंबर महिन्यात ५ पोलीस अधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. नायगावमधील लवेश माळी या तरुणाच्या हत्याप्रकरणाचा तपास केल्याबद्दल गुन्हे शाखा-२ चे शाहूराज रणावरे यांना सर्वोत्कृष्ट तपासाचा पुरस्कार देण्यात आला. एका व्यापाऱ्याच्या अपहरणाचा गुन्हा उघडकीस आणल्याबद्दल काशिमीरा पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक संदीप कदम यांना गौरविण्यात आले. ५५ लाखांचे अमली पदार्थ जप्त केल्याप्रकरणी तुळींज पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक शैलेंद्र नगरकर यांना सर्वोत्कृष्ट तपासाबद्दल गौरविण्यात आले. गॅस सिलेंडर चोरी करून विकणाऱ्या टोळीला अटक करून मोबाईल आणि गॅस सिलेंडर चोरीचे ६ गुन्हे मध्यवर्ती गुन्हे शाखेने उघडकीस आणले होते. याबाबत राहुलकुमार राख यांना सर्वोत्कृष्ट पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. विरार पोलिसांना नोव्हेंबर महिन्यात सर्वोत्कृष्ट तपासाचे दोन पुरस्कार मिळाले आहेत. विरार पोलिसांनी मोबाईल खेचून पळणाऱ्या एका टोळीचा पर्दाफाश करून ९ गुन्हे उघडकीस आणले होते. ज्येष्ठ नागरिकांना रस्त्यात अडवून हातचलाखीने लुटणाऱ्या अजय-विजय या ठकसेनांच्या टोळीला अटक केली होती. या दोन गुन्ह्यांतील सर्वोत्कृष्ट तपासासाठी विरार पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कांबळे यांना सर्वोत्कृष्ट तपासाचा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. तत्कालीन पोलीस आयुक्त सदानंद यांनी ३ वर्षांपूर्वी दर महिन्याचे सर्वोत्कृष्ट तपासाचे पुरस्कार देण्याची प्रथा सुरू केली होती. २०२३ या वर्षात गुन्हे शाखा २ ने सर्वाधिक म्हणजे ११ सर्वोत्कृष्ट तपासाचे पुरस्कार मिळवले. पोलीस निरीक्षक शाहूराज रणावरे यांच्या नेतृत्वाखालील गुन्हे शाखा २च्या पथकाने कामगिरीत सातत्य ठेवल्याने मागील तीन वर्षांत सर्वोत्कृष्ट तपासाचे ३२ तर एकूण १७० पुरस्कार मिळवले आहेत.



मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्त मधुकर पांडे याच्या हस्ते विरार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कांबळे यांना उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल प्रशस्तीपत्रक देऊन सत्कार केला.

# उपराष्ट्रपती यांची विडंबना करणाऱ्या विरोधात भिवंडीत भाजपची तीव्र निदर्शने




**भिवंडी/प्रतिनिधी**

लोकशाहीचे मंदिर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या संसद भवन परिसरात आंदोलन करताना तृणमूल काँग्रसचे खासदार कल्याण बॅनर्जी यांनी उपराष्ट्रपती व राज्यसभा सभापती जगदीप धनखड यांचा व्यंगत्वावर अवमान करणारे असभ्य व अशोभनीय वर्तन केले. विशेष म्हणजे हे विडंबन करणारे आंदोलन सुरू असताना काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी याचे मोविल चित्रीकरण केले. या घटनेचे तीव्र पडसाद भारतात उमटत असून गुरुवारी देशभर भाजपा कार्यकर्ते या घटनेचा निषेध करण्या साठी रस्त्यावर उतरले. भिवंडीत शहराध्यक्ष अँड हर्षल पाटील, भिवंडी पूर्व विधानसभा प्रमुख संतोष शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली भाजपा कार्यालया बाहेर तीव्र निषेध आंदोलने करण्यात आले. या आंदोलनात भाजपा सरचिटणीस राजू गाजंगी, महिला मोर्चा शहराध्यक्षा ...पान ६ वर

# ३४वा वसई तालुका कला क्रीडा महोत्सवात ५५ हजारांपेक्षा अधिक स्पर्धकांचा सहभाग!

**● नव्या स्पर्धांचा समावेश ● कला व क्रीडा विभागात तब्बल ७२ स्पर्धा**




**वसई/प्रतिनिधी**

वसई तालुक्यातील विद्यार्थी व नागरिक यांच्या कला व क्रीडा कौशल्यास व्यासपीठ उपलब्ध करून देऊन त्यांना प्रोत्साहन व स्पर्धात्मक संधी देण्याच्या हेतूने वसईत दरवर्षी होणारा, यंदाचा ३४ वा वसई तालुका कला क्रीडा महोत्सव मंगळवार दि. २६ डिसेंबर २०२३ ते रविवार दि. ३१ डिसेंबर २०२३ या कालावधीत संपन्न होत आहे. सन १९९०मध्ये लोकनेते आमदार हितेंद्र ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनाप्रमाणे ३५०० स्पर्धकांच्या सहभागाने सुरू झालेल्या महोत्सवात या वर्षी कला व क्रीडा विभागात एकूण ५५ हजारांपेक्षा अधिक स्पर्धकांनी सहभाग घेतला आहे. दरवर्षी मिळणाऱ्या अभूतपूर्व प्रतिसादामुळे हा महोत्सव वर्षागणिक एक निराळी उंची गाठत आहे. महोत्सवाच्या पूर्वसंध्येला, ख्रिसमस सणाचे औचित्य साधून, समाजात सुदृढ आरोग्य आणि तंदुरुस्तीचा संदेश देणारी 'ख्रिसमस फिटनेस रन', नानभाट विरार ते नरवीर चिमाजी अप्पा मैदान, वसई या मार्गावर दि. २५ डिसेंबर २०२३ रोजी दुपारी ४ वाजता आयोजित करण्यात आली असून दक्षिण आफ्रिकेत ९० कि.मी.ची 'कॉम्रेड रन' पूर्ण करणारे वसईचे शिलेदार सर्वश्री योगेश पाटील, प्रशांत चव्हाण, स्वप्नील पाटील आणि प्रमोद चौधरी हे कॉम्रेड रनर्स, तसेच बॅसीन कॅथॉलिक बँकेचे संचालक सॅबी डायस हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. मंगळवार दि. २६ डिसेंबर २०२३ रोजी आमदार क्षितिज ठाकूर ह्यांच्या हस्ते दुपारी २.३० वाजता विरार पूर्वेकडील स्वातंत्र्यवीर सावरकर चौक येथे क्रीडा ज्योतीचे प्रज्वलन होऊन सदरची ...पान ६ वर

# पालघर येथील ग्रामीण रुग्णालयामध्ये वैद्यकीय आणि दंत शिबीराचे आयोजन

**पालघर/प्रतिनिधी**

ग्रामीण रुग्णालय, पालघर येथे दि. १९ ते २२ डिसेंबर २०२३ दरम्यान मोफत वैद्यकिय व दंत शिबीर आयोजित करण्यात आले आहे. सदर शिबीरात ग्रॅन्ट वैद्यकिय महाविद्यालय व जे. जे. समुह रुग्णालय, मुंबई येथील तज्ञ डॉक्टराकडून सर्व वयोगटातील रुग्णांना सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया उदा. हर्निया, हायड्रोसिल, गर्भपिशवी किंवा गाठ काढणे, अपेन्डिक्स, फायमोसीस, या प्रकारच्या शस्त्रक्रिया मोफत करण्यात येणार आहेत. सदर शिबीर हे साधारणता सकाळी १०:३० वाजता सुरु होईल या शिबीराकरिता नोंदणी कक्ष येथे गरजू रुग्णांनी नोंदणी करुन घ्यावी त्यानंतर रुग्णांची तपासणी तज्ञ डॉक्टरांकडून होईल. शस्त्रक्रियेची आवश्यकता असणाऱ्या रुग्णांची शस्त्रक्रिया पुर्व रक्त तपासणी व इतर तपासण्या करुन रुग्णांना आंतररुग्ण विभागात दाखल करुन घेण्यात येईल. सदर शिबीरामध्ये सामान्य रुग्ण, कान-नाक-घसा हया संदर्भातील आजार, हाडांविषयीच्या समस्या, दंत रोगावरील उपचार, स्त्रीयांचे आजार, त्वचा संबंधीत विकार, मनोविकार, डोळयांचे आजार, कुष्ठरोग, क्षयरोग आदि आजारांवरील उपचार करण्यात येतील. हे शिबीर सार्वजनिक आरोग्य सेवा राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत मोफत वैद्यकिय व दंत शिबीर जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय बोदाडे, यांच्या अधिपत्याखाली तसेच ग्रामीण रुग्णालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या साहाय्याने आयोजित करण्यात आले आहे तसेच गरजू रुग्णांनी या सुवर्णसंधी चा लाभ घ्यावा असे आवाहन ग्रामीण रुग्णालय, पालघरचे वैद्यकिय अधिक्षक डॉ. जितेन जैस्वाल यांनी केले आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियान, अंतर्गत ग्रामीण रुग्णालय, पालघर येथे सर्वरोगनिदान शस्त्रक्रिया व दंतचिकित्सा महाशिबीराचे उद्घाटन ग्रॅण्ट वैद्यकिय महाविद्यालय व जे.जे. समुह रुग्णालय, मुंबई येथील बालशस्त्रक्रिया विभाग प्रमुख डॉ. मिनाक्षी भोसले यांच्या हस्ते संपन्न झाले. या वेळी अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सचिन वाघमारे, निवासी वैद्यकिय अधिकारी डॉ. योगेश सुरळकर, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. शंशीकांत वाघमारे, डहाणू उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकिय अधिक्षक डॉ. बालाजी हेगंणे, जे. जे. रुग्णालयाचे भूलतज्ञ डॉ. अमीसा बेग, दंतरोगतज्ञ डॉ. अनंत बिडवे, विरार ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकिय अधिक्षक डॉ. शंतनु कुंडगीर तसेच ग्रामीण रुग्णालय, पालघर येथील वैद्यकिय अधिक्षक डॉ. जितेन जैस्वाल, नाक-कान-घसा तज्ञ डॉ. राखी माने, मानसोपचार तज्ञ डॉ. अमोल भुसारे, अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. प्रशांत राजगुरु, रेडीऑलॉजिस्ट डॉ. बळीराम सोनावणे, डॉ. दिपक कुर्नुकर, डॉ. दत्ता नारायणकर तसेच ग्रामीण रुग्णालय, पालघर येथील सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.




सदरील शिबीरात बालरोग शस्त्रक्रिया, जनरल शस्त्रक्रिया, स्त्रीरोग शस्त्रक्रिया तसेच इतर सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया व दंत रोगाच्या सर्व प्रकारच्या आजाराचे निदान व शस्त्रक्रिया मोफत करण्यात येणार आहेत. सदरील सर्वरोग निदान व दंतचिकित्सा शिबीर दि. १९/१२/२०२३ ते २१/१२/२०२३ या कालावधीत ग्रामीण रुग्णालय, पालघर येथे घेण्यात येणार आहे. सदरील शिबीर नियोजन करण्या विषयीची प्रस्तावना डॉ. जितेन जैस्वाल यांनी व्यक्त केली, डॉ. योगेश सुरळकर यांनी शिबीराचे महत्तव विशद केले तर प्रमुख पाहुण्या डॉ. मिनाक्षी भोसले यांनी बालकांमध्ये वेळीच शस्त्रक्रिया करण्याचे महत्व विशद केले सुत्रसंचालन व आभार डॉ. उमेश दुम्पलबार यांनी केले. या वेळी नाक-कान-घसा तज्ञ डॉ. राखी माने, मानसोपचार तज्ञ डॉ. अमोल भुसारे, अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. प्रशांत राजगुरु, रेडीऑलॉजिस्ट डॉ. बळीराम सोनावणे, डॉ. दिपक कुर्नुकर, डॉ. दत्ता नारायणकर तसेच ग्रामीण रुग्णालय, पालघर येथील सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# महानगरपालिका परिवहन सभापतीपदी कल्पक पाटील



**विरार/प्रतिनिधी**

वसई-विरार शहर महापालिकेच्या परिवहन समितीच्या सभापती पदाच्या निवडणुकीत एकच अर्ज दाखल झाल्याने सभापती पदी उमेदवार कल्पक पाटील यांचा एकमेव अर्ज मंजूर झाला. पालिकेच्या प्रशासकीय कारभारासोबत एकच परिवहन समितीचा कारभार सुरु आहे. पालिकेचा प्रशासकीय कारभार निवडणुका न लागल्याने गेली तीन वर्षे सुरु आहे. अपवाद परिवहन समितीचा. तीन वर्षांपासून परिवहन समितीचा कारभार सुरु आहे. या समितीची निवडणूक २१ डिसेंबर रोजी झाली. या समितीवरील आधीच्या पदाधिकाऱ्यांचा कार्यकाळ मागील महिन्यातच संपला आहे. आता परिवहन समितीच्या सभापती पदासाठी निवडणूक पार पडली. आधीच्या सभापतींची मुदत ३० नोव्हेंबर २०२३ रोजी संपली आहे. मात्र परिवहन समितीच्या सर्व सदस्यांचा कार्यकाळ जानेवारी २०२४ मध्ये समाप्त होणार असल्याने नव्या परिवहन सभापतींना कामकाज पाहण्यासाठी ...पान ६ वर

## विरार पोलिसांची धडाकेबाज कारवाई

# २० लाखांच्या ड्रग्जसह दोघांना अटक

**विरार/प्रतिनिधी**

विरार पूर्वेकडील मनवेलपाडा येथील मोहक सिटीजवळून सुमारे २० लाख रुपये किमतीच्या एमडी (मेफेड्रोन) या अमली पदार्थासह विरार पोलिसांनी गुरुवारी दोघांना अटक केली, अशी माहिती विरार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कांबळे यांनी दिली आहे. मनवेलपाडा येथील मोहक सिटी परिसरात एमडी (मेफेड्रोन) नावाचे ड्रग्ज विकण्यासाठी दोन ड्रग्ज तस्कर असल्याची गुप्त माहिती गुरुवारी विरार पोलिसांच्या तपास शाखेच्या पथकाला मिळाली. त्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्याच्या आदेशानुसार विरार पोलिसांच्या तपास शाखेने सदर ठिकाणी सापळा रचून दोन अंमली पदार्थ तस्करांना अटक केली. पोलिसांच्या चौकशीत आरोपीने आपले नाव मोहम्मद इशाक शेख असल्याचे सांगितले तर दुसऱ्याने त्याचे नाव मोहम्मद मोईनुद्दीन शेख असल्याचे सांगितले, जो



मुंबईतील धारावी भागातील रहिवासी आहे. झडतीदरम्यान पोलिसांनी त्यांच्याकडून एमडी (मेफेड्रोन) नावाचे ९७ ग्रॅम औषध जप्त केले. आंतरराष्ट्रीय बाजारात या औषधाची किंमत अंदाजे १९,४०,००० रुपये होती. पोलिसांनी त्यांच्याकडून वजनकाटा आणि बुलेट मोटरसायकलसह २०,९०,६३० रुपयांचा माल जप्त केला. याप्रकरणी विरार पोलिसांनी आरोपीविरुद्ध एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे. परिमंडळ ३ चे पोलीस उपायुक्त सुहास बावचे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस आयुक्त रामचंद्र देशमुख, विरार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कांबळे, पोलीस निरीक्षक (गुन्हे शाखेचे) अभिजीत मडके, सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर कोकाटे, सचिन लोखंडे, विशाल लोहार, संदीप शेरमाळे, योगेश नागरे, संदीप शेळके, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, प्रफुल्ल सोनार यांच्यासह पथकाने पार पाडली.

# गाव पाड्यातील मुलींनी जाणून घेतले मुख्यालयाचे कामकाज!



**पालघर/प्रतिनिधी**

खोडाळा येथील दोन ग्रामपंचायत आणि १३ पाड्यातील मुली आरोहण संस्थेमार्फत आणि करोळचे सरपंच नरेंद्र येले यांच्या मार्फत जिल्हा मुख्यालय पाहण्यासाठी आल्या होत्या. यातील अनेक मुली पहिल्यांदाच पालघर पाहण्याचा अनुभव घेतला. प्रशासकीय इमारत कशी आहे, मा.जिल्हा परिषद अध्यक्ष कोण आहेत त्यांचे कामाचे स्वरूप काय आहे, हे या मुलींनी जाणून घेतले. यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम यांनी मुलींना आपल्या दालनात बसवून मुलींसोबत हासून खेळून संवाद साधला. तसेच मनमोकळेणाने अनेक विषयांवर चर्चा केली. यावेळी अध्यक्ष निकम यांनी मीदेखील मोखड्यासारख्या दुर्गम भागातून आश्रमशाळेत शिक्षण घेऊन इथपर्यंत आलो आहे. आदिवासी तरुण तरुणी शिक्षण अपूर्ण ठेवून बालविवाह करतात, प्रेमप्रकरणाला बळी पडतात त्यामुळे तुम्ही अशा कुठल्याही प्रलोभनाला बळी न पडता शिक्षण घेऊन खूप पुढे जा, आणि आपले आयुष्य घडवा. तुमच्यातील च कोणी उद्या सरपंच ...पान ६ वर